cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com   नवी दिशा... नवे विचार.....   email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–९१ | शनिवार, दि.२६ जुलै २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### ‘ईडी’चे वाभाडे...!

सर्वोच्च न्यायालयाने मुदा घोटाळा प्रकरणात सक्तवसुली संचालनालयाची (ईडी) खरडपट्टी काढली आहे. कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्या पत्नी बी. एम. पार्वती यांच्या विरोधात ईडीने जारी केलेले समन्स कर्नाटक उच्च न्यायालयाने रद्द केले. त्याविरोधात ईडीने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. त्यावर सुनावणी सुरू असताना सर्वोच्च न्यायालयाने ईडीची कानउघाडणी केली. सरन्यायाधीश भूषण गवई आणि न्या. के. विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने ईडीला खडे बोल सुनावले. राजकीय लढाया न्यायालयाबाहेर लढायला हव्यात.

### अजित पवार आणि विजय घाडगेंची भेट

मुंबई–उपमुख्यमंत्री अजित पवार येत्या मंगळवारपर्यंत कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्यासंदर्भात निर्णय घेणार आहेत. छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विजय घाडगे यांनी शुक्रवारी अजित पवार यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान अजित पवार यांनी घाडगे यांना याबाबत शब्द दिला आहे. तसेच, सूरज चव्हाण यांना पक्षात पुन्हा सामील करून घेणार नसल्याचेही अजित पवार यांनी स्पष्ट केले. छावा संघटनेच्या विजय घाडगे यांनी अजित पवार यांच्याशी चर्चा केल्यानंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. त्यांनी सांगितले की, अजित पवार यांनी माणिकराव कोकाटे यांच्या प्रकरणी येत्या मंगळवारपर्यंत निर्णय घेण्याचे आश्वासन दिले आहे. शिवाय, सूरज चव्हाण यांना पक्षात परत घेणार नसल्याचेही अजित पवार यांनी यावेळी नमूद केल्याचे घाडगे यांनी सांगितले.




# मराठवाड्यात अजूनही दमदार पावसाची प्रतिक्षा


## बीडसह इतर जिल्ह्यातील अर्ध्यापेक्षा जास्त धरण रिकामे

बीड। प्रतिनिधी

**गेल्या दोन ते तीन दिवसापासून मराठवाड्यातील बहुतांश जिल्ह्यात पाऊस सुरु आहे. मात्र हा पाऊस रिमझिम असल्याने अजूनही अर्ध्यापेक्षा जास्त धरण हे रिकामे असून दमदार पावसाच्या प्रतिक्षेत सध्या शेतकरी आहेत.**

यंदा मे महिन्यात जोरदार पाऊस झाल्याने बऱ्याच भागातील तलाव भरले असून काही भागातील धरणातील पाणी अजून जोत्याच्या खाली आहे. जून महिन्यात

▶▶ पान २ वर



### सोयाबीन पिवळी पडू लागली

जूनसह जुलै महिन्यात पावसाने बराच खंड दिला असल्याने सोयाबीन पिक हे ट्रेसमध्ये गेले असल्याचे चित्र आहे. त्यामुळे बऱ्याच भागात सोयाबीन पिवळे पडू लागली आहे. याबाबत कृषी विभागाने शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्याची गरज आहे.










cmyk

अग्रलेख

# ईडीचे वाभाडे...!

सर्वोच्च न्यायालयाने मुदा घोटाळा प्रकरणात सक्तवसुली संचालनालयाची (ईडी) खरडपट्टी काढली आहे. कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्या पत्नी बी. एम. पार्वती यांच्या विरोधात ईडीने जारी केलेले समन्स कर्नाटक उच्च न्यायालयाने रद्द केले. त्याविरोधात ईडीने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. त्यावर सुनावणी सुरू असताना सर्वोच्च न्यायालयाने ईडीची कानउघाडणी केली. सरन्यायाधीश भूषण गवई आणि न्या. के. विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने ईडीला खडे बोल सुनावले. राजकीय लढाया न्यायालयाबाहेर लढायला हव्यात. अशा लढायांसाठी ईडीचा वापर का होतोय असा सवाल न्यायालयाने केला. ईडीचे अधिकारी सर्व मर्यादांचे उल्लंघन करत असून या यंत्रणेचा राजकीय लढाईमध्ये वापर केला जात आहे, अशा परखड शब्दांत सर्वोच्च न्यायालयाने ताशेरे ओढले.

दुर्दैवाने महाराष्ट्रात मला काही अनुभव आले आहेत. कृपया मला जास्त बोलायला लावू नका. अन्यथा आम्हाला ईडीबद्दल खूप कठोर बोलावे लागेल. राजकीय लढाया निवडणुकीत लढायला हव्यात, त्यासाठी तुमचा वापर का होतोय? असा सवाल सर्वोच्च न्यायालयाने केला. न्यायालयाच्या या आक्रमक पवित्र्यामुळे ईडीची बाजू मांडणारे अतिरिक्त महाधिवक्ता एस. व्ही राजू नरमले. आम्ही याचिका मागे घेतो पण याचा पायंडा पडता कामा नये असे राजू म्हणाले. यानंतर न्यायालयाने याचिका फेटाळली. कर्नाटक उच्च न्यायालयाने रद्द केलेले समन्स योग्यच असल्याचा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने दिला. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशात काहीही गैर असल्याचे आम्हाला वाटत नाही. त्यातील तथ्य योग्यच आहे. त्यामुळे आम्ही याचिका फेटाळत आहोत. आम्ही यावर अधिक कठोर शब्दांत सुनावणार होतो पण अतिरिक्त महाधिवक्त्यांनी याचिका मागे घेण्याची तयारी दर्शवली, त्याबद्दल त्यांचे आभार, असे सर्वोच्च न्यायालय म्हणाले. सिद्धरामय्या यांच्या पत्नी पार्वती यांच्याशी संबंधित 'म्हैसूर अर्बन डेव्हलपमेंट ॲथॉरिटी' (एमयूडीए) प्रकरणातील कार्यवाही रद्द करण्याच्या कर्नाटक उच्च न्यायालयाच्या आदेशाविरुद्ध ईडीने अपील दाखल केले होते.

आर्थिक गुन्ह्यांच्या प्रकरणात आरोपीला सल्ले देणाऱ्या काही वकिलांना नोटिसा बजावल्या प्रकरणीही सर्वोच्च न्यायालयाने ईडीची खरडपट्टी काढली आहे. वकिलांना ज्या पद्धतीने नोटिसा पाठवण्यात आल्या आहेत ते पाहता विधि व्यवसायाचे स्वातंत्र्य प्रभावित होऊ शकते. ईडी आता सर्व मर्यादा ओलांडत आहे, अशी टिप्पणी सरन्यायाधीश गवई यांनी केली.

केअर हेल्थ इन्शुरन्स रेलिगेअर एन्टरप्राईजेस कंपनीच्या माजी अध्यक्षा रश्मी सलुजा यांनी कर्मचारी समभाग विकल्प योजनेद्वारे (ईएसओपी) समभाग देण्याचा निर्णय घेतला होता. या प्रकरणात ज्येष्ठ वकील अरविंद दातार यांनी सलुजा यांना कायदेशीर सल्ला दिला होता. सलुजा यांना देण्यात आलेल्या ईएसओपी प्रकरणाची ईडी आणि भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरणाकडून चौकशी सुरू आहे. केवळ कायदेशीर सल्ला म्हणून दातार आणि प्रताप वेणूगोपाल यांना नोटिसा बजावल्याच्या ईडीच्या कृत्यावर न्यायिक वर्तुळात तीव्र पडसाद उमटले होते. सर्वोच्च न्यायालयाने स्वत:हून या प्रकरणाची दखल घेत सुनावणी चालू केली आहे. वकील आणि त्याच्या अशिलामध्ये काही संवाद झाला असेल तर त्यावरून कशी काय नोटीस जारी केली जाऊ शकते असा सवाल सरन्यायाधीश गवई यांनी केला. यासाठी काही मार्गदर्शक तत्त्वे असली पाहिजेत असे सरन्यायाधीश म्हणाले. न्यायालयाने केंद्रीय तपास यंत्रणांबाबत पसरवल्या जाणाऱ्या गैरसमजांच्या प्रभावाखाली येऊ नये, अशी अपेक्षा मेहता यांनी सुनावणी दरम्यान व्यक्त केली तेव्हा आम्ही बातम्या आणि यूट्यूबवरील मुलाखती बघत नाही, असे उत्तर सरन्यायाधीश गवई यांनी दिले. केवळ ईडीच नव्हे, तर एखाद्या संस्थेविरुद्ध कथानक तयार करण्याचा एकत्रित प्रयत्न होतो, असे सांगण्याचा प्रयत्न झाला तेव्हा ईडीचे मर्यादा उल्लंघन ही आम्हाला आढळलेली बाब आहे असे सरन्यायाधीशांनी स्पष्ट केले. विरोधकांवर राजकीय सूडभावनेने कारवाई करण्यासाठी सत्ताधा-यांच्या तालावर नाचणाऱ्या ईडीचे सर्वोच्च न्यायालयाने अक्षरश: वाभाडे काढले. ईडीच्या कार्यपद्धतीचा व्हायरस देशभर प्रत्येक ठिकाणी पसरवू देऊ नका, असा सज्जड दम न्यायालयाने ईडीला दिला. न्यायालयाने ईडीचे वाभाडे काढल्याने केंद्र सरकारच्या वकिलांनी अपील मागे घेण्याची परवानगी मागितली, मात्र न्यायालयाने तशी परवानगी न देता अपील फेटाळून ईडीला दणका दिला. ईडीसारख्या यंत्रणांचा गैरवापर हा भारतीय संविधानाचा गैरवापर आहे. कायद्याची, न्यायाची कोणतीही मूल्ये ईडीने पाळल्याचे दिसत नाही.

# विकासाच्या महामेरू लोकनेत्या पंकजाताई मुंडे!

जीवनात संकट आली तर रडायचं नसत, लढायचं असत ,आलेल्या संकटाला संधी मानायच असत,असा दूरदृष्टीचा विचार करून कार्यकर्त्याला शिकवण देणाऱ्या , जन्मता नावात कमळ (पंकजा) असणाऱ्या ,अनुकंपा म्हणून नव्हे तर आपलं अवघ्या महाराष्ट्रात विविध मंत्री पदाच्या माध्यमातून अतिशय उत्कृष्ट काम करणाऱ्या, कर्तृत्व ,नेतृत्व,दातृत्व, सर्व सामान्य जनतेला व पदाधिकारी कार्यकर्त्यांना प्रेम देऊन मातृत्व सिद्ध करून दाखवणाऱ्या , मुंडेसाहेबांच्या निधनानंतर, कार्यकर्त्यांच्या पंखाना बळ देऊन,जलयुक्त शिवाराच्या माध्यमातून अवघ्या महाराष्ट्राला पाणी पुरवणाऱ्या ,जलयूक्त शिवारामार्फत बीड जिल्हाची ओळख भारतभर निर्माण करणाऱ्या,बीड जिल्हाच्या पालकमंत्री असताना पालकत्वाची जिम्मेदारी प्रामाणिकपणे सांभाळणाऱ्या ,मुंडे साहेबाईतकेच, सामान्य जनतेवर, कार्यकर्त्यांवर ,प्रेम करून मायेची ऊब देऊन ,नेता म्हणून नव्हे तर माता म्हणून आपले प्रामाणिक कर्तव्य पारपाडणाऱ्या, सामान्य जनतेच्या प्रत्येक हितासाठी संघर्ष करणाऱ्या ,आमचा स्वाभिमान ,महाराष्ट्राची मुलूखमैदानी तौफ या राज्याच्या पशुसंवर्धन , पर्यावरण व भावी मुख्यमंत्री म्हणजे ताई.

आपल्या प्रत्येक कामातून कार्यातून पक्षाने दिलेले कुठलेही जिम्मेदारी असेल मग ती जिम्मेदारी दुसऱ्या राज्यातील जरी असेल ती जिम्मेदारी देखील प्रामाणिकपणे पार पाडताना ताई नेहमीच दिसतात., या अगोदर २०१४ ते २०१९ मध्ये जी मंत्री पदे मिळाली होती त्या प्रत्येक मंत्रिपदाच्या खात्याच्या माध्यमातून उत्कृष्ट काम केले व त्या खात्याची मंत्रीपद गाजवली तसेच



सध्या मिळालेले पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्रीपद असेल त्या पदाची देखील कामे उत्कृष्ट पद्धतीने चालत असल्यामुळे.या खात्याचे मंत्रीपदे मिळालेले देखील ताई गाजवत आहेत अशा पद्धतीने कुठल्याही खात्याचे मंत्रीपद दिले तरी आपल्या कार्याच्या व कामाच्या माध्यमातून ताई उत्कृष्ट पद्धतीने कार्य करताना दिसतात.पंकजाताई मुंडे ह्या लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या सारख्याच एक लढवय्या नेत्या आहेत आयुष्यात कितीही संकटे संघर्ष करावा लागला तरी योग्य ती भूमिका घेऊनच शेवटपर्यंत थांब राहणार कोणापुढेही झुकणार नाही हे मुंडे साहेबाची शिकवण त्यांनी कायम लक्षात ठेवून हीच शिकवण आम्हा सर्व पदाधिकाऱ्यांना देखील दिली आहे. नुकतीच लोकसभा निवडणूक त्यांनी लढवली या निवडणुकीच्या काळामध्ये अनेक समाजातील व्यक्तींनी आरक्षणाच्या माध्यमातून ताईच्या विरोधात अतिशय विषारी प्रचार करून व वातावरण गढूळ केले व त्यामुळे ताईचा अल्पमताने पराभव झाला.त्या पराभवामुळे ताईच्या अनेक कार्यकर्त्यांनी आत्महत्या केल्या एवढी गंभीर परिस्थिती होऊन देखील ताईने कधीही प्रत्युत्तर दिले नाही,कारण अगोदरच जिल्ह्यामध्ये वातावरण गढूळ झाले होते सामाजिक सलोखा राखणे हे पालक म्हणून आपले कर्तव्य आहे याची जाण ठेवून ताईने कोणालाही उत्तर दिले , कसलीही कोणावरही टीका केली नाही जिल्ह्यातील वातावरण गढूळ होऊ नये याकडे लक्ष दिले व सर्व समाजाला एकत्रित घेऊन एक ठाम भूमिका घेतली ही ताईंनी सर्वांसाठी संयमी घेतलेली भूमिका कधीही कुणीही कुठलाही समाज बांधव विसरणार नाही , आदरणीय पंकजाताईंनी कधीही कोणात्याच समाजाच्या आरक्षणाला थेट विरोध केलाच नाही,तर ते आरक्षण चौकटीत बसून कसे टिकेल याविषयी फक्त त्या बोलल्या, त्यामुळे एवढा विषारी प्रसार करून देखील काही प्रमाणात ठराविक लोक अशा विषारी प्रचाराला बळी पडले परंतु सर्व समाजातील व्यक्तींनी देखील त्यांना मतदानरुपी खूप सहकार्य केले आशीर्वाद दिले व त्यामुळे अशा गढूळ वातावरणात देखील त्यांचे चाहते त्यांचा वर्ग हा किती प्रमाणात आहे यातून ही सर्वांनाच लक्षात आले जातीपातीचे राजकारण करून कल्पनाताने पराभव जरी झाला असला तरी ह्या केवळ जिल्ह्यातच नाही तर महाराष्ट्रामध्ये सर्व जिल्ह्यांमध्ये ताईचे आज ही तशीच क्रेझ , नावलौकिक आहे ,आणि त्यामुळे मुंडे साहेब यांच्यासारख्याच पंकजाताई यादेखील एक लोकप्रिय लोकनेते व लढवय्या नेत्या आहेत. कार्यकर्त्याच्या प्रत्येक सुख दु:खामध्ये सहकार्य करून त्यांना संकटकाळी देखील कार्यकर्त्यांच्या पंखांना बळ देऊन त्यांना उभारी देणाऱ्या फक्त लोकनेत्या ताईच आहेत.आजही महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात तालुक्यात प्रत्येक वाड्या वस्ती तांडे ग्रामीणभागासह प्रत्येक गावात ताई जातात त्या ठिकाणी त्यांच्या आजूबाजूला हजारो जनसमुदाय दिसतो त्यामुळेच त्या महाराष्ट्रातल्या खऱ्या अर्थाने लोकनेत्या आहेत. २०१४ ते २०१९ मध्ये ताईसाहेब सत्तेत असताना ताईने ऐतिहासिक फंड आणला,बीड जिल्ह्याला त्यांनी दिला तेवढा फंड आज पर्यंत कधीही कोणत्याच नेत्याने आणला नाही त्यांच्या काळामध्ये त्यांनी जलयुक्त शिवार सारख्या विविध योजना राबवल्या त्याची दखल केंद्र शासनाने व राज्य शासनाने देखील घेतली.ग्रामसडक योजनेच्या माध्यमातून प्रत्येक गावामध्ये रस्ते उभारणीचे काम केले, शासनाच्या प्रत्येक योजना त्यांनी अतिशय उत्कृष्ट, नियोजन पद्धतीने ,राबवल्या ताईने एकंदरीत आपल्या कामातून कर्तृत्वातून व मुंडे साहेबांचा विचार वारसा जपत त्या ठिकाणी कार्य केले त्यामुळे खऱ्या अर्थाने लोकनेत्या आहेत. पालकमंत्री असताना जिल्ह्यामध्ये ताईने किती मोठे काम केले व खऱ्या अर्थाने पालकत्वाची भूमिका किती चांगली कर्तव्य पूर्वक व प्रामाणिकपणे सर्वांना सहकार्य व प्रेम देत निभावली ही कोणीही विसरू शकणार नाही,व बीड जिल्ह्याला ताई पालकमंत्री म्हणून जरी नसल्या तरी बीड जिल्ह्यात आजही त्याच खऱ्या अर्थाने सर्वांना सहकार्य करत असल्यामुळे त्या पालकत्वाची भूमिका निभवत असल्यामुळे खऱ्या अर्थाने ताईसाहेब मुंडे साहेबांचा वसा आणि वारसा निभावत त्या आदर्श पालक म्हणून आपल्याला दिसतात २०१४.ते २०१९ मध्ये सत्तेत असताना महाराष्ट्रातील सर्वसामान्य व्यक्तींचे घरकुलचे प्रश्न असतील शिक्षकांच्या ऑनलाइनच्या माध्यमातून बदल्या असतील डिजिटल शाळेसह शाळेचे विविध बदल असतील व लोकनेते मुंडे साहेब यांच्या जयंतीच्या निमित्त विविध महाआरोग्य शिबिर असतील,अनेक वर्षापासून प्रलंबित असलेला रेल्वेचा प्रश्न असेल हे देखील त्यांनी केलेले कार्य सर्वांनीच पाहिले आहे. व अशाच पद्धतीने वाटचाल आज देखील त्या मंत्री असताना करत आहेत.येणाऱ्या काळात मुंडे साहेबांचे राहिलेले स्वप्न ताई साहेब निश्चितच पूर्ण करणार आहेत त्यामुळे जिल्ह्यातील सर्व नागरिकांचे प्रश्न मार्गी लागल्याशिवाय राहणार नाहीत हा विश्वास सर्वांचाच आहे परंतु येणाऱ्या काळाततरी जिल्ह्याची जर प्रगती पाहिजे असेल तर अनेक राजकीय मंडळी विषारी अपप्रचाराच्या माध्यमातून विविध डावपेच करतील व जिल्ह्याचे वातावरण गढूळ करण्याचा प्रयत्न करतील हे कोणीही विसरू नका व त्या मुळे ताईच्या पाठीमागे भक्कमपणे आशीर्वादरुपी उभे रहा ह्याच त्यांच्या वाढदिवसानिमित्त सर्वांनी शुभेच्छा द्याव्या हीच बीड जिल्ह्यातील सर्व नागरिकांकडून व्यक्त करतो.



**विनायक रत्नपारखी**
**भारतीय जनता पार्टी शहर मंडळाध्यक्ष माजलगाव.**

# पोकरा प्रकल्पाच्या आराखड्याचे घाटा पिंपरी येथे सादरीकरण

धामणगाव प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील घाटा पिंपरी येथे दिनांक २३ जुलै २०२५ रोजी नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प (पोकरा) टप्पा २.० अंतर्गत लोकसहभागीय पद्धतीने सूक्ष्म नियोजन व गावस्तरीय हवामान अनुकूल आराखडा तयार करणे याविषयी जनजागृती कार्यक्रम व प्रभात फेरी घेण्यात आली. कार्यक्रमाला कृषि विभागातील अधिकारी व हनुमान विद्यालय घाटा पिंपरी येथील श्री तांदळे व श्री गोरे तसेच विद्यार्थी व गावातील सरपंच, उपसरपंच, सर्व ग्रामपंचायत सदस्य, वि का से स सो चेअरमन, उमेद महिला बचत गट, गावातील प्रगतशील



शेतकरी व इतर ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी ग्रा. कृ. वि. स सदस्य, स्वयंसेवक, कृषिताई व इतर ग्रामस्थ यांनी सहकार्य केले.यावेळी रांगोळीच्या सहाय्याने गाव नकाशाचे रेखाटन करण्यात आले . रांगोळी रेखांकणाकरीता श्री प्रमोद खुटाळे व श्री स्वप्निल जगधने मंडळ कृषि अधिकारी, श्री अजय सातपुते , श्री प्रदीप देवकर , श्रीम. रोहिणी खेडकर , श्रीम. मंदा खराडे मॅडम, व श्रीम. स्नेहल घोडके सहाय्यक कृषि अधिकारी, कृषिताई व इतर समिती सदस्य यांनी विशेष परिश्रम घेऊन सुबक रंगसंगती करून गाव संसाधन नकाशा जलसंधारणाच्या बाबींसह रेखांकित केला व ग्रामस्थांच्या उपस्थित नकाशा वाचन केले. त्यानंतर प्रकल्प जनजागृतीसाठी गावामधून विद्यार्थी, महिला व इतर ग्रामस्थांच्या उपस्थितीत प्रभात फेरी काढण्यात आली. प्रभात फेरीनंतर सविस्तर चर्चा व मार्गदर्शन करण्यात आले त्यामध्ये हवामान बदलास अनुसरून शेती पद्धती, लोकसहभागाचे महत्व, गावातील पाण्याचा ताळेबंद, उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर, खरीप व रब्बी हंगाम पिकांचे नियोजन, फळबाग लागवड तसेच काढणीपश्चात व्यवस्थापन व कृषि मूल्य साखळी आधारित कृषि पूरक उद्योग या याविषयी श्री प्रमोद खुटाळे साहेब मं कृ अ धानोरा यांनी मार्गदर्शन केले. तसेच श्री स्वप्निल जगधने मं कृ अ कडा यांनी शेतकऱ्यांनी उपलब्ध निविष्ठांचा व संसाधनांचा कार्यक्षमतेने वापर करून उत्पादन खर्च कमी करणे व जमिनीची सुपीकता वाढवणे, शेती विषयक नवीन संशोधनाचा उपयोग करून गट शेती संकल्पना व सेंद्रिय अन्? पौष्टिक उत्पादनावर भर देणे याविषयी चर्चा व मार्गदर्शन केले. घाटा पिंपरी येथील स कृ अ श्रीम. रोहिणी खेडकर यांनी पोकरा प्रकल्पाचा परिचय व प्रकल्पातील वैयक्तिक लाभाच्या योजना याविषयी माहिती दिली. तसेच गावातील प्रगतशील शेतकऱ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले व या प्रकल्पात सहभागी होऊन सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता झाली.

# आता कोणीही वैद्यकीय उपचारा पासुन वंचीत राहाणार नाही -जयश्री विधाते

बीड । प्रतिनिधी

आषाढ मास आणि पावसाळा ऋतुत होणारे संसर्गजन्य आजार या पार्श्वभूमीवर स्त्री-शक्ति प्रतिष्ठान बीड आणि सानप हॉस्पिटल नगर रोड बीड. यांच्या संयुक्त विद्यमाने महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शिका सभापती तथा नगरसेविका संस्थापक अध्यक्षा स्त्री शक्ति प्रतिष्ठान बीड जयश्री विलास विधाते यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात आता कोणीही पैशा अभावी वैद्यकीय उपचार पासुन वंचीत राहाणार नाही. यासाठी आपल्या जिल्हाधिकारी कार्यालयात असलेल्या मुख्यमंत्री साहाय्यता



निधी व धर्मादाय रुग्णालय कक्ष गरजु रुग्णाला वेळेत मदत मिळावी म्हणून तत्पर आहे. या कक्षात प्रमुख म्हणून वैद्यकीय अधिकारी डॉ. चैतन्य कागदे यांच्या अधिपत्याखाली एक समाजसेवा अधिक्षक, लिपिक आणि समन्वयक काम पहातात. या कक्षा अंतर्गत गंभीर आणि जीवघेण्या आजारावर उपचारासाठी अर्थिक मदत मिळते. यात कॅन्सर, हार्ट अटॅक, किडनी, लिव्हर ट्रान्सप्लांट, ॲक्सिडेंटमुळे होणारे ऑपरेशन, तसेच इतर महागड्या उपचारासाठी निधी दिला जातो. या योजनेचा लाभ घेण्यासाठी विहित नमुन्यातील अर्ज, निदान व उपचारासाठी लागणाऱ्या वैद्यकीय खर्चाचे प्रमाणपत्र, खाजगी रुग्णालय असल्यास सिव्हिल सर्जन यांचे प्रमाणपत्र, एक लाख साठ हजार रुपये पेक्षा कमी उत्पन्न असलेला तहसीलदार कार्यालयाचा उत्पन्नाचा दाखला. रुग्णाचे आधार कार्ड, बाल रुग्णासाठी आईचे आधार कार्ड, रुग्णाचे रेशन कार्ड, संबंधित आजाराचे रिपोर्ट, अपघातग्रस्त रुग्णासाठी एफआयआर रिपोर्ट, ट्रान्सप्लांट रुग्णासाठी रुग्णासाठी झेडटीसीसी किंवा शासकीय समितीची मान्यता आवश्यक आहे. तसेच संबंधित रुग्णाची मुख्यमंत्री सहायता निधी कार्यालयाच्या संगणक प्रणालीवर नोंद असल्याची खात्री करणे गरजेचे आहे. स्त्री शक्ति प्रतिष्ठान आयोजीत महीला मेळाव्यात दिली.

या प्रसंगी डॉ. गीतांजली सानप, भारती सोनवणे, गुजरताई,यांच्यासह परिसरातील अंगणवाडी ताई, आशा वर्कर ताई, बालक आणि माता मोठ्याप्रमाणात उपस्थित होत्या.

पान १वरून...

## मराठवाड्यात अजूनही

सुरुवातीला चांगला पाऊस होईल, असे वाटत असताना मराठवाड्यातील बहुतेक भागात पावसाने दडी मारली. त्यामुळे सोयाबीनसह कापसाचे पीक धोक्यात आले. तर काही भागात पेरण्याच झाल्या नव्हत्या. गेल्या दोन ते तीन दिवसात बीड जिल्ह्यासह मराठवाड्यातील सर्वच जिल्ह्यात रिमझिम पाऊस झाला असून पिकांना जीवदान मिळाले आहे. मात्र धरणं भरण्यासाठी सध्या दमदार पावसाची गरज असून चांगला पाऊस झाला तरच रब्बी पिकं चांगली येऊ शकतील.

# 'प्रचंड' नेतृत्व ' विशाल' कर्तृत्व.....! महाराष्ट्राचे भाग्य, लाभले दिग्गज...

पंकजाताई मुंडे साहेब या नावाभोवती किती आणि कसं वलय आहे हे अखंड महाराष्ट्रानेच नव्हे तर देशानेही अनेकवेळा अनुभवलं आहे. मुंडे साहेबांची लेक या नावातील सामर्थ्य ताईंच्या प्रत्येक कृतीत आहे. गल्लीपासून दिल्लीपर्यंत आणि चांद्यापासून बांद्यापर्यंत ना. पंकजाताईंच्या प्रचंड नेतृत्वाची साक्ष आज उभा महाराष्ट्र देतोय. नेतृत्व कसं असावा आणि त्यातून कर्तृत्व कशा पद्धतीने उदयास येते याचे उत्तम उदाहरण म्हणजे ना. पंकजाताई मुंडे साहेब होय. संघर्ष कन्या, महाराष्ट्राची वाघीण आणि सर्वसामान्य जनतेच्या मनातील लोकनेता म्हणून ताई साहेबांनी मिळवलेली ख्याती ही त्यांच्या कार्यकर्तुत्वाला गवसणी घालणारी आहे. संघर्ष आणि केवळ संघर्ष या दोन शब्दांच्या सामर्थ्यातून ताऊन सुलाखून निघालेल्या या नेतृत्वाने महाराष्ट्र काबीज केलाय. साहेबांची लेक ते जनमान्य ताई आशा विविध रूपातून पंकजाताईंनी घेतलेली झेप ही त्यांच्या सामाजिक आणि राजकीय वाटचालीतील तडाखेबाज, निर्भिड यश म्हणावे लागेल. जय - पराजय , सुख दु:ख पचवत त्यातून मार्ग काढत ताईंचा झालेला प्रवास हा अवर्णनीय , अतुलनीय आणि अविश्वसनीय आहे. भारतीय जनता पार्टीच्या एक सक्रिय कार्यकर्ता ते राज्याचं मंत्रीपद अशा अनेकविध भूमिकेतून पुढे येत असताना ताई साहेबांनी विविध पदावर काम केले. त्यातून त्यांनी सर्वसामान्य कार्यकर्ता आणि सामान्य व्यक्ती केंद्रबिंदू ठेवून प्रत्येकाला तेवढाच सन्मान दिला. देशाचे नेते पंतप्रधान नरेंद्रजी मोदी आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वात पंकजाताईंनी अखंड महाराष्ट्रात चौफेर विकास केला. लोकाभिमुख शासन कसे करता येईल यासाठी त्यांचा नेहमीच पुढाकार राहिला. '' कार्यकर्ता हा माझा जीव आहे आणि त्या जीवासाठीच मी आहे '' हा विश्वास पंकजाताईंच्या नेतृत्वाने उभ्या महाराष्ट्राला दिला. एखाद्या लढवय्या नेत्याप्रमाणे ताईसाहेब परिस्थितीशी लढल्या, ''उतणार नाही - मातणार नाही , घेतला वसा टाकणार नाही '' याप्रमाणे ताईंनी प्रत्येक वेळी समान न्यायाची भूमिका ठेवली. सत्ता असो किंवा नसो, तीच ताकद आणि तोच विश्वास



देण्याचे काम ताई साहेबांनी महाराष्ट्रात केलं. मुंडे साहेबानंतर ताई साहेबांनी बीड जिल्ह्याचे नाव देशात नेलं. त्यामुळेच '' बेटी, पंकजा '' असं म्हणत देशाचे नेते नरेंद्रभाई मोदी आणि अमित शहा यांनी अनेक वेळा ताई साहेबांच्या डोक्यावर हात ठेवला. ज्या मुंडे साहेबांच्या लेकीला अखंड महाराष्ट्रातील तमाम जनतेने तळहातावरील फोडाप्रमाणे जपलं त्याच ताई साहेबांच्या डोक्यावर पक्ष नेतृत्वाने हात ठेवून ताकद दिली. तीच ताकद आज महाराष्ट्रातील तमाम जनतेच्या सेवेसाठी मंत्रिपदाच्या रूपाने कार्यरत आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि ताई साहेबांच्या नेतृत्वात एक नवा महाराष्ट्र घडतोय ही बाब खरोखरच अभिमानास्पद आहे. देशाचे दिवंगत नेते

अटल बिहारी वाजपेयीजी यांच्या
काव्य पंक्ती प्रमाणे......
'' मै हमेशा से ही वादे लेकर नही आया,
इरादे लेकर आया हुं ..! ''

या पंक्ती ताई साहेबांच्या मजबूत इराद्यावर शिक्कामोर्तब करणाऱ्या आहेत.राज्याच्या पर्यावरण आणि पशुसंवर्धन मंत्री म्हणून पंकजाताईंचा राजकीय प्रवास अशाच प्रकारे पुढे पुढे सरकत राहावा आणि त्यांच्या हातून महाराष्ट्रातील जनतेची अविरत सेवा होत राहो हीच सदिच्छा.

ताई साहेबांना वाढदिवसाच्या
अनंत कोटी शुभेच्छा....!

**सलीम जहाँगीर**
**प्रदेश महामंत्री भाजप, अल्पसंख्याकमोर्चा महाराष्ट्र राज्य**

## श्री विठ्ठल रुक्मिणी मातेची नित्य पूजेसाठी नोंदणी

पंढरपुर–श्री विठ्ठल रुक्मिणी मातेची नित्य पूजा, तुळशी अर्चना पूजा, पाद्य पूजा, महानैवेद्य पुजेची पुढील सहा महिन्याची नोंदणी २८ जुलै पासून सुरू होणार आहे. यामध्ये महानैवेद्यपूजेचा नव्याने समावेश करण्यात आला आहे. श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या विविध पूजांसाठी भाविकांकडून मोठी मागणी असते, त्यासाठी मंदिर समितीने गेल्या वर्षीपासून पूजनाची ऑनलाईन नोंदणी सुरू केली आहे.


# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....


## हिंदी सिनेमासाठी मराठी सिनेमाची गळचेपी

मुंबई–हिंदी सिनेमासाठी मराठी सिनेमासची गळचेपी होत आहे हे दिसून येत आहे. अमेय खोपकर यांचा ये रे ये रे पैसा ३ सिनेमाचे शो काढून यशराज फिल्म्सच्या सैयारा या सिनेमाला देण्यात येत आहे हे दिसून येत आहे. आम्ही आताच त्यांना सांगतो आहे की ही गोष्ट आम्ही चालू देणार नाही. अमेय खोपकर यांची निर्मित असलेला सिनेमावर अशी गोष्ट होणं हे वाईट आहे असे संदीप देशपांडे म्हणाले.



# धनंजय मुंडेंना पुन्हा मंत्रीपद, तर ८ मंत्र्यांना डच्चू?

## एकनाथ शिंदेंच्या सर्वाधिक मंत्र्यांचा समावेश; राणेंना बाहेरचा रस्ता?

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील राजकारणात लवकरच मोठा भूकंप होणार आहे. महायुतीतील ८ दिग्गज मंत्र्यांना डच्चू मिळण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. यात सर्वाधिक फटका हा शिंदे शिवसेनेला बसणार असून त्यांच्या चार मंत्र्यांचा राजीनामा घेतला जाण्याची शक्यता आहे. तर दुसरीकडे न्यायालयाने क्लिनचिट दिल्यामुळे माजी मंत्री धनंजय मुंडे यांची पुन्हा मंत्रीमंडळात वर्णी लागणार असल्याचे संकेत अजित पवारांनी दिले आहेत.

गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रातील राजकारण अनेक घडामोडी सुरु आहे. मंत्रिमंडळातील अनेक नेते कुठल्या ना कुठल्या कारणाने चर्चेत आहेत. अशात



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दिल्ली दौऱ्यावर आहे. या दौऱ्यादरम्यान अनेक मोठे आणि दिग्गज नेते फडणवीस यांच्या भेटीला पोहोचत आहेत. त्यासोबत गृहमंत्री अमित शाह यांच्याही भेटीला अनेक नेते मंडळी पोहोचत आहेत. त्यामुळे महाराष्ट्रातील राजकारणात लवकरच मोठा भूकंप होणार अशी चर्चा रंगली आहे. त्यातच महायुतीतील ८ मंत्र्यांना लवकरच डच्चू देण्यात येणार असा दावा सामना या वृत्तपत्रातून करण्यात आला आहे. देवेंद्र फडणवीस यांनी १०० दिवसांच्या कार्यक्रमात काही मंत्र्यांची कामगिरीवर आपण समाधानी नसल्याचे म्हटले आहे. दरम्यान माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर कृषीमंत्री असताना जे निर्णय घेतले त्यावर भ्रष्टाचाराचे आरोप झाले होते. आता न्यायालयाने मुंडे यांना यातून क्लिनचिट दिली असून अजित पवारांनी तर मुंडेंना पुन्हा मंत्रीमंडळात घेण्याचे संकेत दिले आहेत.

### या मंत्र्यांचा घेतला जाणार राजीनामा?

सामनातून करण्यात आलेल्या दावानुसार मंत्री भरत गोगावले, शिक्षणमंत्री दादा भुसे, गृहराज्यमंत्री योगेश कदम आणि सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट या शिंदे गटातील मंत्र्यांना नारळ मिळणार आहेत, असे म्हटले जात आहे. तर अजित पवार गटातील सातत्याने वादग्रत ठरलेले माणिकराव कोकाटे आणि नरहरी झिरवळही हिटलिस्टवर आहेत. भाजपकडून मंत्रिमंडळात स्थान मिळालेल्या मत्स्यविकास मंत्री नितेश राणे आणि ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्याकडून सातत्याने वादग्रस्त वर्तन समोर आले आहे. त्यामुळे त्यांचीही विकेट जाण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

### नेमकं काय म्हणाले अजित पवार?

धनंजय मुंडेंच्या बाबतीमध्ये तुम्ही पेपरला वाचलं, त्यांच्यावर कृषी विभागाचे जे आरोप झाले त्यावर न्यायालयानं काय सांगितलं? त्यांना त्या प्रकरणात क्लिनचिट देण्यात आली, त्या प्रकरणात त्यांचा कुठेही दोष नाहीये, आता अजून त्यांच्या संदर्भातील एक गोष्ट आहे, त्यावर देखील पोलीस यंत्रणा त्यांच्या पद्धतीनं कारवाई करत आहे, या प्रकरणात जर त्यांना क्लिनचिट मिळाली तर आम्ही त्यांना पुन्हा मंत्रिपद देऊ असं अजित पवार यांनी पत्रकारांशी बोलताना म्हटलं आहे.

### मुनगंटीवार होणार विधानसभाध्यक्ष

मंत्रीपद न दिल्याने नाराज असलेले भाजपचे जेष्ट नेते सुधीर मुनगंटीवार यांना विधानसभाध्यक्ष करणार असल्याचे भाकितही सामना वृत्तापत्रातून करण्यात आले आहे. तसेच राहुल नार्वेकरांना मंत्रिपद दिले जाणार अशी चर्चा आहे.

## मद्यपी शिक्षक कुलकर्णी तडकाफडकी निलंबित

### व्हिडिओ व्हायरल, पोलिसात झाला होता गुन्हा दाखल

**बीड । प्रतिनिधी**

**ज्ञानमंदिरातच मद्यप्राशन करून अध्ययन अध्यापन करणाऱ्या मुख्याध्यापकाचा व्हिडिओ व्हायरस झाल्यानंतर आणि पोलिसात गुन्हा दाखल झाल्यानंतर बीड जिल्हा परिषदेने तडकाफडकी या मद्यपी मुख्याध्यापक सुधाकर भगवान कुलकर्णी याला निलंबित करण्याचा निर्णय दिनांक २४ जुलै रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी निलंबनाचे आदेश दिले आहेत.**

गेवराई तालुक्यातील श्रीपत अंतरवाला जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील सुधाकर भगवान कुलकर्णी हे अनेक दिवसापासून शाळेतच मद्य प्राशन करत असल्याचे गावकऱ्यांच्या निदर्शनास आले होते. शिक्षकाच्या या गैरकृत्याविषयीची चर्चा होत होती. कुलकर्णी शिक्षक नेहमीच मद्यधुंद अवस्थेत विद्यार्थ्यांना शिकवीत असल्याची माहिती पालकांना झाली होती. गावातील काही जणांनी दिनांक २१ जुलै रोजी बिसलरी पाण्याच्या बाटलीतील टाकून दारू पित असताना सदर शिक्षकाला काही ग्रामस्थांनी रंगेहात पकडले. या प्रकाराचा व्हिडिओ तयार करण्यात आला होता. सदर प्रकरणी तलवाडा पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली होती. याप्रकरणी गेवराईचे गटशिक्षणाधिकारी यांनी अहवाल शिक्षण विभागाला सादर केला होता. जिल्हा परिषद सेवा, शर्ती, वर्तणूक नियमाचा भंग केला व शिक्षण क्षेत्राची प्रतिमा मलीन केल्याप्रकरणी तात्काळ कुलकर्णी याला निलंबित करण्यात आले आहे. निलंबन कालावधीत कुलकर्णीला परळी मुख्यालय देण्यात आले आहे.






## केजमध्ये उपोषणस्थळी आंदोलनकर्त्या महिलेचा मृत्यू

### आवादा कंपनीच्या विरोधात सुरु होते आंदोलन

**केज । प्रतिनिधी**

**पवन उर्जाशी संबंधीत असलेल्या आवादा कंपनीने आपल्या शेतातून बेकायदा वायर नेल्याच्या विरोधात शेतकऱ्यांनी केज येथील तहसिलसमोर उपोषण सुरु केले होते. यावेळी उपोषणस्थळी आंदोलनकर्त्या महिलेचा मृत्यू झाल्याने मोठी खळबळ माजली आहे.**

अवादा कंपनी गेल्या ६ महिन्यापासून बीडसह राज्यात चांगलीच गाजली असून काही ठिकाणी कंपनीकडून शेतकऱ्यांवर दादागिरी केली जात असल्याचा आरोप होत आहे. कंपनीला प्रशासन आणि शासनाकडून अभय दिला जात असल्याचेही शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. यातच केज तालुक्यात अवादा कंपनीच्या विरोधामध्ये तहसिल कार्यालयासमोर आंदोलन केले जात



होते. यावेळी आंदोलनकर्त्या सुभाबाई गोपाळ भोसले (वय-५८) यांचा मृत्यू झाल्याने प्रशासनाची मोठी पंचाईत झाली आहे. आंदोनकर्त्यांची दखल न घेतल्यानेच व अवादा कंपनीच्या धसक्याने सदरील महिलेचा मृत्यू झाला असल्याचा आरोप होत आहे.


## ज्ञानेश्वरी मुंडेंचा परळी-अंबाजोगाई महामार्गावर रास्ता रोको

**परळी । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यातील महादेव मुंडे खून प्रकरणात अद्याप तपासाला गती मिळालेली नाही. या प्रकरणातील आरोपींना तात्काळ अटक करण्याची मागणी करत महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांनी परळी अंबाजोगाई महामार्गावर रास्ता रोको आंदोलन सुरू केले आहे.**



परळीतील महादेव मुंडे हत्या प्रकरणाचा तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आल्यानंतर आता या प्रकरणाच्या तपासासाठी १० जणांचे विशेष पथक तयार करण्यात आले आहे. या पथकात एक सहायक पोलिस निरीक्षक, एक पोलिस उपनिरीक्षक आणि ८ कर्मचारी आहेत. तांत्रिक पुराव्यांवर पोलिस भर देत आहेत. हत्येत सहभागाचा आरोप झालेला आणि मकोकामध्ये फरार असलेला गोट्या गिते पोलिसांच्या रडारवर आहे. मात्र, तरी देखील आरोपींना अटक होत नसल्याचे ज्ञानेश्वरी मुंडे यांनी आंदोलन करण्याचा पवित्रा घेतला आहे.
















राज्य लोकतंत्र
# शेत-शिवार
शनिवार दि. २६ जुलै २०२५


# राज्यात दोन दिवस राहणार पावसाचा जोर

## विदर्भ, कोकण आणि मराठवाड्यात जोरदार पावसाचा अंदाज



पुणे : राज्यातील बहुतांशी भागात गेल्या दोन दिवसांपासून पाऊस जोरदार हजेरी लावत आहे. विदर्भ, कोकण आणि घाटमाथ्यावर पावसाचा जोर अधिक आहे. राज्यात आज आणि उद्या पावसाचा जोर अधिक राहणार आहे. तर रविवारी काही भागात पावसाचा जोर कमी होईल, असा अंदाज हवामान विभागाने दिला.

`विदर्भातील अनेक भागात मागील ४ दिवसांपासून जोरदार पाऊस पडत आहे. पूर्व विदर्भात पावसाचा जोर अधिक आहे. त्यामुळे अनेक भागात पिकांचे नुकसानही झाले. अकोला, अमरावती, नागपूर, चंद्रपूर, वर्धा, गडचिरोली, भंडारा, गोंदीया जिल्ह्यात पिकाचे नुकसान झाल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. मराठवाडा आणि कोकणातही काही ठिकाणी पावसाने पिकांना दणका दिला. हवामान विभागाने आज विदर्भातील भंडारा, गोंदीया, चंद्रपूर आणि गडचिरोली तसेच कोकणातील रायगड जिल्ह्यात, पुणे आणि नाशिक जिल्ह्याच्या घाटमाथ्यावर अतिजोरदार पावसाचा रेड अलर्ट दिला. तर संपूर्ण कोकण आणि विदर्भातील वर्धा तसेच नागपूर जिल्ह्यात काही ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला. विदर्भातील इतर जिल्हे, पुणे, नगर, नाशिक, धुळे, जळगाव आणि नंदूरबार जिल्ह्यात काही ठिकाणी जोरदार पावसाचा अंदाज आहे. मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, नांदेड, हिंगोली जिल्ह्यातही जोरदार पावसाचा अंदाज आहे. संपूर्ण विदर्भ, संपूर्ण कोकण, धाराशिव आणि लातूर वगळता मराठवाड्यातील इतर जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार पावसाचा अंदाज देण्यात आला. चंद्रपूर, गोंदीया, पालघर आणि पुणे जिल्ह्याच्या घाटमाथ्यावर अतिजोरदार पावसाचा रेड अलर्ट देण्यात आला. तर विदर्भ, मराठवाडा आणि कोकणातील १६ जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट देण्यात आला.

### प्रत्ये विभागात होणार चढ उतार

रविवारी मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात पावसाचा जोर कमी होण्याची शक्यता आहे. कोकण, मध्य महाराष्ट्राचा घाटमाथा आणि विदर्भात काही ठिकाणी जोरदार पावसाचा अंदाज हवामान विभागाने दिला. तर पावसाचा जोर कोकण आणि विदर्भातील काही भागात कमी होण्याची शक्यता आहे. बुलडाणा, अकोला, अमरावती, यवतमाळ, वर्धा, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात तसेच रत्नागिरी आणि रायगड जिल्ह्यात काही ठिकाणी जोरदार पावसाचा अंदाज हवामान विभागाने दिला.

# घरच्या घरी तयार करा निंबोळी अर्क; प्रभावी व पर्यावरणपूरक किटकनाशक



रासायनिक कीटकनाशकांच्या अतिरेकी वापरामुळे पिकांचे नुकसान, मातीच्या गुणवत्तेचा ऱ्हास, मानवी आरोग्यावर दुष्परिणाम आणि पर्यावरणीय संकटे या समस्या गंभीर बनल्या आहेत. यावर एक नैसर्गिक, प्रभावी व किफायतशीर उपाय म्हणजे निंबोळी अर्क. हे किटकनाशक घरच्या घरी तयार करता येते, तेही कोणताही अतिरिक्त खर्च न करता.

निंबोळी अर्क म्हणजे काय? : कडूनिंबाच्या पिकलेल्या फळांपासून तयार होणारा हा अर्क मावा, तुडतुडे, अमेरिकन बोंडअळी, पाने पोखरणारी व देठ कुरतडणारी अळी, फळमाशी, खोडकीडा इत्यादी किडींवर अत्यंत प्रभावी आहे. ५% प्रमाणात फवारणी केल्यास हे किड नियंत्रण सुनिश्चित करता येते.

घरच्या घरी निंबोळी अर्क तयार करण्याची सोपी पद्धत : निंबोळ्यांची तयारी : बांधावर किंवा रस्त्याच्या कडेला पडलेल्या पिकलेल्या निंबोळ्या गोळा करा. त्यातील साल व गर काढून फक्त बिया स्वच्छ धुवून सावलीत वाळवा. कोरड्या ठिकाणी साठवून ठेवा.

निंबोळी पावडर तयार करणे : या बिया खलबत्यात किंवा पल्वरायझरमध्ये बारीक करून ५ किलो पावडर तयार करा. ती ९ लिटर पाण्यात भिजवा. दुसऱ्या भांड्यात १ लिटर पाण्यात २०० ग्रॅम साबणाचा चुरा भिजत ठेवा. अर्क तयार करणे : दुसऱ्या दिवशी निंबोळी अर्क कपड्यातून गाळा. त्यात साबणाचे द्रावण मिसळा. हे मिश्रण ९० लिटर पाण्यात मिसळून १०० लिटर फवारणीयोग्य द्रावण तयार करा.

फायदे : प्रभावी कीड नियंत्रण. अत्यल्प खर्च. सहज उपलब्ध व घरच्या घरी तयार करता येणारा उपाय. पर्यावरणपूरक आणि निसर्गाशी सुसंगत. उत्पादन खर्चात बचत, नफ्यात वाढ. निंबोळी अर्क फवारणीच्या दिवशीच तयार करावा. बाजारातील दर्जाहीन सेंद्रिय किटकनाशकांपेक्षा घरचा अर्क अधिक प्रभावी व सुरक्षित ठरतो.

# सुधारित देशी कोंबड्यांच्या जाती निवडा उत्पादन वाढवा

जास्तीच्या उत्पादनासोबतच अतिरिक्त उत्पादनासाठी परसातील कुक्कुटपालन केले जाते. देशी कोंबड्याची अंडी आणि मांस उत्पादनक्षमता सहसा कमी असते. पण सुधारित कोंबड्यांच्या जाती वापरून हे उत्पन्न वाढविणे शक्य आहे. परसातील कुक्कुटपालनासाठी हैदराबाद येथील कुक्कुटपालन प्रकल्प संचालनालयाने कोंबड्यांच्या विविध जाती विकसीत केल्या आहेत. या कोंबड्या अंडी आणि मांस अशा दुहेरी उत्पादनासाठी उपयुक्त आहेत.

वनराजा : उत्तम रोगप्रतिकारशक्ती आणि कमी खाद्यात जास्त उत्पादन देणारी ही जात आहे. विविध रंगाची पिसे असून दिसायला आकर्षक असतात.

योग्य आहार व्यवस्थापन केल्यास नराचे ८ ते १० आठवड्याच्या वयात एक ते सव्वा किलो वजन मिळते. मादी एका वर्षात १६० ते १८० अंडी देऊ शकते. सामान्य रोगांच्या विरोधात उत्तम प्रतिकार क्षमता या जातींमध्ये दिसून येते.

ग्रामप्रिया : १५ आठवड्यात १.२ ते १.५ किलो वजन मिळते. १६० ते १८० अंडी देण्याची क्षमता असून अंडी आकाराने मोठी ५७ ते ५९ ग्रॅम आणि तपकिरी रंगाची असतात.

गिरीराज : अंडी व मांस अशा दुहेरी उत्पादनासाठी या पक्ष्यांचा वापर केला जातो.

२० ते २२ आठवड्यानंतर हे पक्षी अंडी द्यायला सुरुवात करतात. १०० ते ११० अंडी मिळू शकतात. पूर्ण वाढ झालेल्या नर पक्षाचे वजन ३ ते ३.५ किलो तर पूर्ण वाढ झालेल्या मादी पक्ष्याचे वजन २.५ ते ३ किलोपर्यंत भरते.

श्रीनिधी : विविध रंगी पिसे आणि उत्तम रोग प्रतिकार क्षमता असलेली ही जात आहे. आकाराने मोठी ५३ ते ५५ ग्रॅम वजन असते. ६ आठवडयात ५०० ते ६०० ग्रॅम वजन मिळते. दरवर्षी सरासरी १४० ते १५० अंडी मिळतात.

स्वर्णधारा : स्वर्णधारा कोंबड्या एका वर्षात गिरीराज कोंबडीपेक्षा १५-२० अंडी अधिक देतात. इतर स्थानिक जातींच्या तुलनेत त्यांची वाढ चांगली होते. गिरीराजा जातीच्या कोंबड्या तुलनेत आकाराने लहान आणि हलक्या वजनाच्या असतात. संगोपन अंडी आणि मांस अशा दोन्ही साठी करता येते. २२-२३ व्या आठवड्यात मादी अंदाजे ३ किलो वजनाची होते तर नर अंदाजे ४ किलो वजनाचे होतात. स्वर्णधारा कोंबड्या एका वर्षात अंदाजे १८०-१९० अंडी देतात.

हितकारी : या कोंबडीला उघड्या गळ्याची कोंबडी म्हणतात. कारण या कोंबडीच्या मानेच्या जागेवर पिसे नसतात. मान पूर्णतः उघडी असते. या कोंबड्या तुलनेने मोठ्या आकाराच्या आणि लांब मानेच्या असतात. नराची वयात आल्यानंतर उघडी त्वचा लाल रंगाची होते. २० आठवड्यांत शरीराचे वजन एक किलो पर्यंत भरते. वार्षिक सरासरी अंडी उत्पादन ९९ इतके मिळते.



# सुक्ष्म जिवाणू व जमीन पोत

सूक्ष्म जिवाणूंच्या वाढीस पोषक असणाऱ्या जमिनीच्या पोताचा व सेंद्रिय पदार्थ याया संबंधाचा विचार केला तर भारी जमिनीपेक्षा हलक्या व जमिनीत ऱ्हास अधिक होतो. याचे कारण म्हणजे हलक्या जमिनीत हवा खेळती राहते व त्यामुळे कुजण्याचा वेग वाढतो. याउलट भारी जमिनीत हवा खेळती राहण्यास प्रतिबंध होतो व कुजण्याचा वेग मंदावतो. याशिवाय भारी जमिनीत सेंद्रिय पदार्थ व त्यांच्या ज्वलनातून निर्माण झालेले उपपदार्थ चिकणमातीच्या कगांवर स्थिर राहिल्याने त्यांचा ऱ्हास कमी होतो.

हवा जितकी अधिक खेळती राहील तितका. सेंद्रिय कर्बाचा कुजण्याचा वेग जास्त राहतो. या बाबींचा संबंध जमिनीच्या मशागतीच्या प्रकाराशीही जवळचा आहे. जितकी मशागत जास्त तितकी जमिनीत खोलवर हवा खेळती राहून सेंद्रिय कर्बाचा ऱ्हास झपाट्याने होतो. त्यामुळे सेंद्रिय कर्बाचा - हास कमी करण्यासाठी जमिनीच्या मशागतीची पातळी किमान व हलक्या स्वरुपाची ठेवणे अधिक श्रेयस्कर ठरेल.

विशेषत: ही बाब हलक्या ते मध्यम जमिनीत अधिक कटाक्षाने लक्षात ठेवली पाहिजे. तापमान हा दुसरा घटक आहे. तापमान जितके जादा तेवढा सेंद्रिय पदार्थांचा -हास अधिक होतो. काही शास्त्रज्ञाने सेंद्रिय पदार्थांच्या कुजण्याचा वेग ठरवणाऱ्या अनेक घटकांचा व त्यांच्या परस्पर संबंधाचा अभ्यास करून असा निष्कर्ष काढला आहे की एखाद्या भौगोलिक स्थानाचे सरासरी



तापमान १० अंश सेल्सिअसने वाढले तर सेंद्रिय पदार्थ कुजण्याचा वेग कमी करण्यासाठी जमिनीवर सेंद्रिय पदार्थांचे आच्छादन व ठिबक सिंचन पद्धतीचा अवलंब करता येतो. परंतु ही व्यवस्थापन पद्धती सर्व ठिकाणी अधिक असलेल्या जमिनीत सेंद्रिय कर्बाचे प्रमाण अधिक असल्याचे आढळून आले आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे तापमानाचे नियमन तर आहेच परंतु त्याशिवाय तेथे सेंद्रिय पदार्थांची निर्मितीही फार मोठ्या प्रमाणात होत असते. `सेंद्रिय पदार्थातील कर्बाचे गुणोत्तर जेवढे कमी तेवढा सेंद्रिय पदार्थ कुजण्याचा वेग अधिक आढळून येतो. म्हणूनच द्विदलवर्गीय पिकांचे अवशेष हे एकदल पिकांच्या तुलनेने लवकर कुजतात व पर्यायाने सेंद्रिय पदार्थांचा वेगाने व्हास होतो. म्हणून कर्बे नत्राचे वेगवेगळे गुणोत्तर असणारे शेतातच उपलब्ध होणारे सेंद्रिय पदार्थ वापरल्यास कर्बाची पातळी बऱ्यापैकी राखण्यास मदत होते.

हरवळीच्या पिकांमध्ये वेगवेगळ्या पिकांचा समावेश करा

प्रत्येक प्रकारच्या वनस्पतीच्या मुळाभोवती विशिष्ट प्रकारच्या जिवाणूंच्या प्रजाती अधिक प्रमाणात व प्रभावीपणे कार्यरत असतात. म्हणून हिरवळीच्या पिकांमध्ये वेगवेगळ्या पिकांचा समावेश करावा. शेतीमध्ये सेंद्रिय पदार्थांची उपलब्धता वाढविण्यासाठी वेगवेगळ्या उंचीची विविध मोसमात फुलांवर व फळांवर येणारी सदाहरित तसेच पानगळ होणारी यांचे सुयोग्य मिश्रण असणारी वृक्षराजी वनशेती पद्धतीच्या माध्यमातून निवडणे हितावह होईल.

सूक्ष्म जिवाणूंची कार्ये

टाकाऊ सेंद्रिय पदार्थ व त्यांचे अवशेष कुजविणे. वेतील नत्राचे जमिनीत स्थिरीकरण करणे. वनस्पतीतील अन्नद्रव्यांचे चक्रीकरण करून त्यांची उपलब्धता वाढविणे. संप्रेरकाची निर्मिती करून अविद्राव्य अन्नद्रव्यांचे रुपांतर विद्राव्य स्वरुपात करून त्यांची उपलब्धता वाढविणे.

कार्बनयुक्त पॉलीसॅकराइड्स या संयुगांची निर्मिती करून जमिनीतील मातीच्या कणांचे संग्रहीकरण सुधारविणे. त्यामुळे जमिनीच्या प्राकृतिक गुणधर्मात सुधारणा होणे. जमिनीत मातीत प्रवेश केलेल्या कीटकनाशकासारख्या विषारी द्रव्यांचे विषारीपण कमी करणे. जमिनीत प्रतिजैविके निर्माण करून पिकांना उपद्रवी असलेल्या सूक्ष्मजिवाणूंचा नाश करणे. सेंद्रिय पदार्थाचे विघटन करून साध्या सेंद्रिय संयुगात रुपांतर करणे (ही संयुगे पिकांकडून सहज शोषून घेतली जातात. उदा. ॲमिनो आम्ले).




### महत्वाच्या घटना

१७६१ : माधवराव बल्लाळ भट ऊर्फ 'थोरले' माधवराव हे मराठा साम्राज्यातील ४ थे पेशवे बनले.
१८६६ : आयर्लंडच्या व्हॅलेन्शिया द्वीपापासून कॅनडातील ट्रिनिटी बेपर्यंत समुद्राखालील तार घालण्याचे काम पूर्ण. युरोप अमेरिकेच्या दरम्यान तारसंदेश पाठवणे शक्य झाले.
१८९० : डच चित्रकार व्हिन्सेंट व्हॅन गॉगने स्वत:वर गोळी झाडुन घेतली. दोन दिवसांनी त्याचे निधन झाले.
१८९७ : बाळ गंगाधर टिळक यांना पहिल्यांदा कैद करण्यात आलं.
१९२१ : रक्तातील साखरेवर 'इन्सुलिन' या संप्रेरकाचे नियंत्रण असते असे टोरांटो विद्यापीठातील सर फ्रेड्रिक बँटिंग आणि चार्ल्स बेस्ट यांनी सिद्ध केले. तसेच त्यांनी 'इन्सुलिन' शुद्ध स्वरुपात विभक्त करण्यात यश मिळवले.
१९४० : ॲनिमेट शॉर्ट फिल्म ए जंगली हेअर मधून बग्स बनी हे पात्र प्रकाशित झाले.
१९४९ : पहिल्या प्रवासी जेट विमान, डी हॅविललँड कॉमेटचे पहिले उड्डाण.
१९५५ : दोस्त राष्ट्रांनी ऑस्ट्रियातुन आपले सैन्य काढुन घेतले.
१९८३ : कोलंबो येथील वेलिकाडा तुरुंगात सिंहली कैद्यांनी १८ तामिळ राजकीय कैद्यांची हत्या केली.
१९८७ : पुरातत्व विभागाच्या संशोधकांना टायटॅनिक जहाजाचा मलबा सापडला.
१९९७ : तामिळनाडुचे मुख्यमंत्री आणि द्रमुकचे अध्यक्ष एम. करुणानिधी यांची सलग सातव्यांदा पक्षाच्या अध्यक्षपदी निवड झाली. हा एक विक्रम आहे.
१९९९ : द्रवखनिज तेलवायूचा वाहनांसाठी इंधन म्हणून वापर करण्याचा प्रस्ताव पेट्रोलिअम मंत्रालयाने मंजूर केला.
२००१ : सार्वजनिक ठिकाणे, शासकीय इमारती, सार्वजनिक वाहने या ठिकाणी सिगारेट, तंबाखू, गुटखा सेवनावर व थुंकण्यावर तसेच या वस्तूंची सार्वजनिक ठिकाणी जाहिरात करण्यावर बंदी घालण्याचा महाराष्ट्र मंत्रीमंडळाचा निर्णय
२०१२ : लंडन येथे ३० व्या येथे ऑलिम्पिक स्पर्धांना सुरुवात झाली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६६७ : योहान बर्नोली स्विस गणितज्ञ (मृत्यू: १ जानेवारी १७४८)
१७२४ : राजस्थान मधील मेवाड प्रांताचे शासक महाराणा प्रतापसिंह द्वितीय यांचा जन्मदिन.
१८९९ : ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू पर्सी हॉर्नी ब्रूक यांचा जन्म.
१९११ : डॉ. पांडुरंग वासुदेव तथा पां. वा. सुखात्मे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे संख्याशास्त्रज्ञ व आहारतज्ञ, पद्मभूषण (१९७१) (मृत्यू: २८ जानेवारी १९९७)
१९१३ : भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या कार्यकर्त्या कल्पना दत्त यांचा जन्मदिन.
१९१५ : ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू जॅक आयव्हरसन यांचा जन्म.
१९४० : भारतीय वंशीय अमेरिकन लेखिका व कादंबरीकार भारती मुखर्जी यांचा जन्मदिन.
१९५० : ग्रामी पुरस्कार सन्मानित उत्कृष्ट हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत वीणा वादक व्ही. एम. भट्ट यांचा जन्मदिन.
१९५४ : भारतीय वकील आणि राजकारणी जी.एस. बाली यांचा जन्म.
१९५५ : ॲलन बॉर्डर ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू
१९६३ : पाकिस्तानी क्रिकेट खेळाडू नवेद अंजुम यांचा जन्म.
१९६७ : भारतीय अभिनेते, दिग्दर्शक, आणि पटकथालेखक राहुल बोस यांचा जन्म.
१९६९ : दक्षिण आफ्रिका क्रिकेट संघातील माजी क्रिकेटपटू व मुंबई इंडियन संघाचे प्रशिक्षक जोंटी रोड्स यांचा जन्मदिन.
१९८३ : भारतीय फुटबॉल खेळाडू सॉकर वेल्हो यांचा जन्म.
१९९० : भारतीय हिंदी चित्रपट अभिनेत्री कृती सॅनॉन यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८४४ : जॉन डाल्टन इंग्लिश भौतिक व रसायनशास्त्रज्ञ (जन्म: ६ सप्टेंबर १७६६)
१८९५ : उस्ताद बंदे अली खाँ बीनकार, किराणा घराण्याचे प्रवर्तक, सूक्ष्म स्वरांचे भान असणारे व मधुर वादन करणारे असा त्यांचा लौकिक होता. पुण्यात नव्या पुलाजवळील दर्ग्याच्या परिसरात उस्ताद बंदे अली खाँ यांची कबर आहे. (जन्म: )
१९३५ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी रमाबाई आंबेडकर यांचे निधन.
१९७५ : त्र्यं. र. ऊर्फ मामासाहेब देवगिरीकर गांधीवादी नेते, खासदार. भारतीय राज्यघटनेचे मराठीत भाषांतर करुन २६ जानेवारी १९५० रोजीच ते वाचकांच्या हातात देण्याचे काम त्यांनी केले. (जन्म:)
१९८० : मोहम्मद रझा पेहलवी इराण देशाचे शेवटचे शासक व शाह ऑफ इराण म्हणून प्रसिद्ध (जन्म: २६ आक्टोबर १९१९)
१९९२ : अमजद खान हिन्दी चित्रपटसृष्टीतील नावाजलेले खलनायक (जन्म: १२ नोव्हेंबर १९४० गझनी, अफगाणिस्तान)
१९९७ : बळवंत लक्ष्मण वष्ट हिंदुत्त्ववादी कार्यकर्ते
२००२ : कृष्णकांत भारताचे १० वे उपराष्ट्रपती (जन्म: २८ फेब्रुवारी १९२७)
२००७ : वामन दत्तात्रय पटवर्धन स्फोटके व शस्त्रास्त्र तज्ञ (जन्म: ३० जानेवारी १९१७)
२०१५ : भारताचे ११ वे राष्ट्रपती ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचे निधन. (जन्म: १५ ऑक्टोबर १९३१). भारतीय सर्वोत्कृष्ट पुरस्कार भारतरत्न, तसचं, पद्मभूषण व पद्म विभूषण पुरस्कार सन्मानित ''मिसाईल मॅन'' म्हणून प्रसिद्ध भारतीय वैज्ञानिक व माजी भारतीय राष्ट्रपती

# खा.सोनवणेंकडून महामार्ग, रेल्वेसाठी सतत पाठपुरावा; केंद्रीय मंत्र्यांची भेट घेवून मांडले प्रश्न

## पाठपुराव्यातील चिकाटी पाहून केंद्रीय मंत्री गडकरींनी थोपटली पाठ

बीड

जल्ह्यातील विविध राष्ट्रीय महामार्गाचे काम तातडीने पुर्ण करावेत, महामार्ग कामे करीत असताना जिथे-जिथे तांत्रिक दोष झालेले आहेत ते दुरुस्त करावेत, भेगा पडलेल्या महामार्गांची दुरूस्ती करावी, अशा विविध मागण्यांसाठी खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची दल्लिीत भेट घेतली. यावेळी सततचा पाठपुरावा पाहून मंत्री नितीन गडकरी यांनी पाठ थोपटली. तर जल्ह्यिातील रेल्वेच्या संदर्भात केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेवून रेल्वे संदर्भातील विषयावर चर्चा केली. यावेळी मंत्री वैष्णव यांनी रेल्वेसंदर्भाने मांडलेल्या सर्व मागण्यांबाबत सकारात्कता दर्शवली.

दि.२४ जुलै रोजी खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या कार्यालयात त्यांची भेट घेतली. यावेळी शेगाव-पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग मधील परतूर-माजलगाव बिटमधील सादोळा (ता.माजलगाव) येथील अपूर्ण असलेली सर्व कामे तातडीने पूर्ण करण्याची मागणी केली. माजलगाव-केज बिटमधील नादुरुस्त भागांची दुरुस्ती व तांत्रिक दोष दूर करण्याबाबत नर्दिश द्यावेत, धारूर घाटातील प्रस्तावित वळण मार्गाचे काम तसेच बर्दापूर-लोखंडीसावरगाव चौपदरीकरणाचे काम लवकरात लवकर सुरू करावे, केज-कळंब मधील मांजरा नदीवरील पुलाच्या कामासंदर्भात नर्मिाण झालेल्या अडचणी दूर करून काम पूर्ण करावे, पैठण-पंढरपूर रस्ता व अहमदपूर-मांजरसुंबा-पाटोदा या रस्त्यांवरील समस्या तातडीने सोडवाव्यात व प्रस्तावित अतिरक्ति बाबींना मंजुरी देण्यात यावी. छत्रपती संभाजीनगरबीडसोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील गेवराई तालुक्यातील गढी येथील उड्डानपुल व रस्ता हा विभागाच्या तांत्रिक दोषामुळे अपघात होऊन ६ युवकांचा दुर्दैवी मृत्यू ओढवला. या तांत्रिक दोषाची जबाबदारी नश्चिति करण्यात यावी. मयतांच्या कुटूंबियांना मदत करण्यात यावी, अशी आग्रही मागणी केली. या सर्व मुद्द्यांकडे ना.गडकरी यांनी वैयक्तिक लक्ष घालण्याचे आश्वासन दिले व उर्वरित कामे तातडीने पूर्ण करण्यासाठी संबंधितांना सूचना दल्यिा. याच वेळी तुमचा बीड जल्ह्यिाच्या विकासासाठीचा पाठपुरावा आणि धडपड चांगली आहे, अशा शब्दात पाठीवर थाप देवून कौतूक केले. यानंतर रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांची त्यांच्या संसदभवन कार्यालयामधे खा.सोनवणे यांनी भेट घेतली.





यावेळी, आहल्यिानगर-बीडपरळी रेल्वे प्रकल्पाअंतर्गत प्रस्तावित १० रोड ओव्हर ब्रिज व ढोलेवस्ती (बीड) रोड अंडरपासचे काम त्वरीत सुरू करण्यात यावे. बार्शीनाका (बीड शहर) रेल्वे स्टेशनवर प्रवासी संख्येच्या प्राथमिकतेच्या आधारे थांबा देण्यास मंजुरी देणे, अंबाजोगाई तालुक्यातील घाटनांदूर रेल्वे स्टेशनवर रेल्वेगाड्यांना थांबा देण्याचा प्रस्ताव मंजूर करून आदेश त्वरित नर्गिमित करणे, बीड-आहल्यिानगर-सीएसटी (मुंबई) अशी नियमीत रेल्वेसेवा लवकर सुरू करावी, अशी मागणी केली. यावेळी मंत्री वैष्णव यांनी सकारात्मकता दाखवित मागण्यांसदर्भात कार्यवाही करण्याचा शब्द दिला.

# कुटे-बडे वस्ती पर्यंतचा शेतरस्ता महसुली दप्तरात नोंद होणार !

## महसुली प्रशासन व ग्रामरस्ता समितीचा संयुक्त पंचनामा



शिरूर। प्रतिनिधी

हिवरसिंगा पासुन दक्षिणोत्तर असणारा नदीतटा लगतचा पारंपारिक वहिवाटीस असणारा शेतरस्ता महसुली दप्तरातील व गाव नकाशावरील प्रमाणित नसल्यामुळे येणा-या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी श्री.शिवराम राऊत (शिवश्री कृषी मंडळ) व पिडीत ग्रामस्थांच्या वतीने अनेक वर्षापासुन संघर्ष चालू होता.त्यास ग्राम रस्ता समिती हिवरसिंगा यांच्या माध्यमातून शहादेव सानप (मंडळ अधिकारी) गणेश बडे (तलाठी) दत्तात्रय शिंदे (मा.सरपंच) ज्ञानोबा शिंदे (उपाध्यक्ष तंटामुक्त समिती) सह श्रीधर सानप,प्रल्हाद सानप,शाम दुधाळ,अभिजित सानप,अशोक कुटे,सावता दुधाळ,विश्वनाथ बडे या पंचा समक्ष हिवरसिंगा नदी ते देवकर ,नांगरे,दुधाळ,सानप वस्ती,शिंदेवस्ती,कुटे-बडे वस्ती (कानिफनाथ नगर ) पर्यंतचा प्रचलित व पारंपारिक शेतरस्ता प्रत्यक्ष जायमोका पाहणी करण्यात आली.यामध्ये नदीतटा लगत आसणारे गट नं. ची पडताळणी करुन इतर हक्कात नोंद करून भूमी अभिलेख प्रशासनाच्या गाव नकाशात प्रमाणिकरण करण्यासाठी आवश्यक त्या बाबी पूर्ण करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली.या नोंदी अभावी शेत रस्ता विकास करणे शक्य होत नसल्याने वस्ती रहिवासी आसणारे शेतकरी यांना आपले शेतीची कामे, औजारे, खते बियाणे यांची वहिवाटीत समस्या प्रमाणेच विद्यार्थी,रूग्ण,शेतमजूर,जवळपास ६०% रहिवाश्यांयांचा रस्ताअभावी अनेक समस्यांचा सामना करावा लागत होता.यामुळे शेत रस्ता महसुली दप्तरात नोंदीसाठी शेतक-यांच्या मागणीस्तव स्थळपाहणी संपन्न झाली आहे.यावेळी नवनाथ बडे,लखन कुटे,बाजिराव बडे,अंकुश कुटे,बाबुराव कुटे,सर्जेराव कुटे,बाळू कुटे,विष्णू शिंदे,कृष्णा शिंदे,किसन कुटे,जालिंदर राऊत,सतिष कुटे,मुकिंद बडे,अशोक शिंदे,बळिराम शिंदे,प्रल्हाद शिंदे,सोनलाल सानप सह परिसरातील शेतकरी यांची उपस्थिती होती. या रस्ता नोंदीची पुढील प्रक्रिया लवकरच पूर्ण करणार असल्याचे महसुली विभागाणे दिले आहे.

# बालग्रामधील विद्यार्थ्यांकडून लोकशाहीचा जागर!

## मतदानाद्वारे झाली विविध समित्यांची निवड;अभिनव उपक्रमाचे सर्वत्र कौतुक!




गेवराई । प्रतिनिधी

येथील बालग्राम परिवारातील सहा व्यवस्थापकीय समित्यांसाठी नुकतीच निवडणूक घेण्यात आली होती. यात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त मतदान करत विविध समित्यांची निवड केली. विद्यार्थी दशेत लोकशाही प्रक्रियेची ओळख करून देणाऱ्या बालग्रामच्या स्तुत्य उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

पालख्या डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या सहारा अनाथालय तथा बालग्राम परिवारातील विद्यार्थ्यांची एकूण व्यवस्था स्वतः विद्यार्थीच पाहतात. त्यासाठी लोकशाही प्रक्रियेद्वारे मतदान घेऊन शिक्षण समिती, स्वच्छता व आरोग्य समिती, सांस्कृतिक समिती, आहार व पाहुणचार समितीसह क्रीडा समितीची स्थापना करण्यात येते. या समित्यांचा कालावधी एक वर्षाचा असतो. २०२५ सालची निवडणूक नुकतीच पार पडली. सहा समित्यांसाठी एकूण २२ उमेदवारांनी निवडणूक लढवली. सर्व उमेदवारांना चिन्ह वाटप करत बॅलेट पेपरवर निवडणूक घेण्यात आली. उमेदवारांनी दोन दिवस आपल्या चिन्हाचा प्रचार करत विद्यार्थी मतदारांपुढे आपल्या भूमिका जोरदारपणे मांडल्या. विद्यार्थ्यांनीही शांतता व शिस्तीचे पालन करत उत्स्फूर्तपणे मतदान केले. बालग्रामचे संतोष व प्रीती गर्जे यांच्यासह अधीक्षक, काळजी वाहक, स्वयंसेवक व स्वयंपाकी मावशी यांनी देखील मतदानात सहभाग घेतला होता. दुसऱ्या दिवशी मतमोजणी करून निकाल कळवण्यात आला. यात सर्वाधिक मते मिळवून विजयी झालेला कृष्णा माने क्रीडा समितीच्या अध्यक्षपदी निवडून आला. मयूर सुरवसे शिक्षण समिती अध्यक्ष, दिपाली हिरोळे आहार व पाहुणचार समिती अध्यक्ष, काजल तुकाराम वनवे सांस्कृतिक समिती अध्यक्ष, तर आकाश मोरे स्वच्छता व आरोग्य समितीच्या अध्यक्षपदी निवडून आले. आदित्य जाधव, दिव्या जाधव, वैष्णवी गर्जे, शिवकन्या जाधव, रवी खाडे, कल्पेश अरसूळ, अनुराधा सरोदे, राज माळी, संकेत बोडके सदस्यपदी निवडून आले. काजल वनवे, विठ्ठल फाटे, श्रेयस नाडे, अनुष्का डोंगरे, आकाश मोरे, हर्षद डमाळे, रुपेश हिरोळे, करण माळी आदींना मतदारांनी बिनविरोध निवडून दिले. अधीक्षक संदीप नेहे, काळजी वाहक पवार, धम्मपाल, सुवर्णा, गोपाल यांनी निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यासाठी सहकार्य केले. विजयी उमेदवारांसह निवडणुकीत सहभाग घेणाऱ्या सर्वांचे विद्यार्थ्यांनी अभिनंदन करत पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

मतदान हा लोकशाहीचा सर्वाधिक महत्त्वाचा भाग असतो. पण आजही आपल्या देशातील मताचा टक्का हा ६० ते ७० च्या पुढे सरकत नाही ही दुर्दैवी गोष्ट असून देशाच्या भावी नागरिकांना विद्यार्थीदशेतच लोकशाहीची ओळख व्हावी. तसेच स्वतःच्या जबाबदाऱ्या स्वतः पार पाडण्यात त्यांनी सक्षम व्हावे, विद्यार्थ्यातील नेतृत्वगुणांना वाव मिळावा यासाठी आम्ही छोटासा प्रयत्न करत असल्याचे बालग्रामचे संतोष गर्जे यांनी सांगितले.

# श्रावण मासानिमित्त भालचंद्र गणपती मंदिरांची भक्तांकडून स्वच्छता मोहीम

लिंबागणेश । प्रतिनिधी

श्रावण महिना अध्यात्माचा,मन:शुद्धीचा पावित्र्याचा आणि व्रतवैकल्याचा संस्कृतीचे मोठे महत्त्व म्हणून ओळखला जातो. ऊन पावसाचा लपंडाव खेळणारा, इंद्रधनुष्याची कमान बांधणारा,हिरवाईचा गालिचा अंथरुणारा व्रतवैकल्याने सात्विकतेचा सडा शिंपणारा, निसर्गाची समृद्धी उधळणारा श्रावण महिना आज दि.२५ शुक्रवार पासुन सुरु झाला असुन २३ आगस्ट पर्यंत श्रावणाचा बहर सुरू राहणार आहे.सण उत्सव, व्रतवैकल्याची मांदियाळी घेऊन आलेल्या या हिरव्या ऋतुच्या स्वागतासाठी प्रत्येक जण आतुर झाला आहे. धार्मिक विधी,सण यांची रेलचेल असल्याने सर्वत्र उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.



आपल्या संस्कृतीत या महिन्याला अनन्यसाधारण महत्त्व असुन यानिमित्ताने महादेव मंदिरासह सर्वच मंदिरांमध्ये भाविकांची दर्शनासाठी,पुजा,अर्चा करण्यासाठी गर्दी होते. आपण नतमस्तक होणारा परीसर स्वच्छ असायला हवा यासाठी श्रावण महिन्यात गावातील सर्वच मंदिरांची स्वच्छता करताना पहावयास मिळते. मंदिराच्या स्वच्छतेसाठी भाविक, तरूण मंडळी, वारकरी सगळेच आघाडीवर असतात. आज बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील श्रीक्षेत्र भालचंद्र गणपती मंदिर, हनुमान मंदिर, खंडोबा मंदिर, श्रीकृष्ण मंदिर आदी मंदिराची स्वच्छता करण्यात आली.

स्वच्छता मोहीमेत दगडु कांबळे,गणपत दाभाडे, कल्याण वाणी,शिवाजी वाणी, वरद जोशी,अभिजित गायकवाड,सुरज भोसले,अक्षय आबदार, रोहित भोसले कमलाकर जाधव,सचिन भोसले,विवेक भोसले, हरिओम क्षीरसागर आदि सहभागी झाले होते. प्रति वर्षाप्रमाणे लिंबागणेश येथील श्रीक्षेत्र भालचंद्र गणपती मंदिरात परंपरागत विना उभारण्यात आला. सर्वप्रथम भजणी मंडळी व भाविकांच्या उपस्थितीत गणपती पुजन , नवग्रह पुजन व ग्रंथराज पुजन करून विना उभारण्यात आला.यावेळी देवस्थान विश्वस्त, पुजारी आणि भाविक मंडळी उपस्थित होती. महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

# जय भवानी महाविद्यालयात दामिनी पोलीस पथकाची भेट

पाटोदा

पाटोदा. पाटोदा येतील जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे कला व विज्ञान महाविद्यालय पाटोदा येथे आज दिनांक २५ जुलै २०२५ रोजी पाटोदा पोलीस स्टेशनच्या वतीने विद्यार्थी व विद्यार्थ्यांना शिस्त लावण्यासाठी पाटोदा पोलीस स्टेशनचे सन्माननीय पीएसआय दामिनी पथकाच्या प्रमुख पवार मॅडम यांनी महाविद्यालयात भेट देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले विद्यार्थ्यांनी व विद्यार्थी यांनी आपला वेळ वाया न घालता आपल्या आई-वडिलांसाठी आपण सतत ज्ञान संपादन केले पाहिजे व मुलींना महाविद्यालयात काही गैरसोय होत असेल तर त्यांनी दामिनी पथक यांना संपर्क साधण्याचे आवाहन केले पाटोदा पीएसआय यांनी मार्गदर्शन केले दामिनी पथकाच्या प्रमुख पवार मॅडम यांनी सुद्धा मार्गदर्शन केले या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे मार्गदर्शक प्राचार्य डॉ विश्वास कदम प्रभारी प्राचार्य सोमनाथ घाडगे सर लोकप्रशासन विभागाच्या विभाग प्रमुख प्राध्यापक कल्पना घारगे मॅडम त्याचबरोबर कनिष्ठ महाविद्यालयाचे विभाग प्रमुख प्राध्यापक सतीश जरांगे पाटील प्रा दिसले सर प्रा भगत सर डॉ गोविंद बांम दळे ग्रंथपाल मॅडम प्रा डॉ लोखंडे यांनी सहकार्य केले



# विद्यार्थ्यांकडून बोर्डेक्स पेस्ट यशस्वी प्रात्यक्षिक; शेतकऱ्यांच्या ज्ञानात भर




बीड । प्रतिनिधी

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी अंतर्गत सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर (के.एस.के.) कृषि महाविद्यालय, बीड येथील कृषीदतानी हिंगणी हवेली येथे ग्रामस्थांसाठी बोडेक्स पेस्ट प्रात्यक्षिकाचे यशस्वी आयोजन केले. या उपक्रमात कृषीदूतानी गावकऱ्याऱ्यांना बोर्डक्स पेस्ट कसे तयार करावे, त्याचे फायदे आणि शेतीत त्याचा प्रभावी वापर कसा करावा, याची सविस्तर माहिती दिली.

बोर्डक्स पेस्ट हे पिकांसाठी एक महत्त्वाचे बुरशीनाशक असून, ते पिकांचे विविध रोगांपासून संरक्षण करून उत्पादन वाढीस हातभार लावते. विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे हे पेस्ट तयार करण्याची पद्धत समजावून करण्याची सांगितल्याने गावकऱ्यांनी त्यात विशेष रुची दाखवली. अनेक शेतकऱ्यांनी या प्रात्यक्षिकाचा उपयोग करून आपल्या शेतात बोर्डक्स पेस्ट तयार करून वापरण्याची तयारी दर्शवली, करून यामुळे त्यांच्या कृषी ज्ञानात भर पडल्याचे समाधान शेतकऱ्यांनी व्यक्त केले. हा उपक्रम गावकऱ्यांसाठी अत्यंत लाभदायक ठरला असून, यामुळे त्यांचे शेतीतले ज्ञान अधिक प्रगल्भ होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे सहसचिव डॉ. जी. व्ही. साळुखे, प्राचार्य डॉ. एस.पी. मोरे, कार्यक्रम समन्वयक प्रा. डॉ. एस.टी. शिंदे. उपक्रमाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. एल. एम.बोंद्रे आणि विशेषज्ञ डॉ. पी. ए. गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी कृषीदूत गुरुदेव गाताडे, महेश गायकवाड, शरद गायकवाड, कलिगोटा चरण, कोमट्टि कृष्णतेजा तेजस कुलकर्णी, महेश गायकवाड हे उपस्थित होते.

**जाहीर प्रगटन**

**मा. श्री. ए. एम. फडतरे, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ९१७/२०२३**

**मार्फत : उबाळे एम. आर.**

अर्जदार : १) सुषमा भ्र. सतिश गोले, वय-४६ वर्षे, धंदा-घरकाम, रा. जवाहर कॉलनी, बीड ता. जि. बीड.

२) संकेत पि. सतिषराव गोले, वय-२७ वर्षे, धंदा-व्यापार, रा. जवाहर कॉलनी, बीड ता. जि. बीड.

३) मंगेश पि. सतिषराव गोले, वय-२१ वर्षे, धदा-शेती व घरकाम, रा. जवाहर कॉलनी, बीड ता. जि. बीड.

विरुध्द

गैरअर्जदार निरंक

अर्जदार हे भारतीय आहेत

प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत नामे सतिष पि. रघुनाथराव गोले यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. मयत नामे सतिष पि. रघुनाथराव गोले, रा. जवाहर कॉलनी, बीड ता. जि. बीड हे दिनांक २६/०४/२०२५ रोजी मराठवाडा कॅन्सर हॉस्पीटल, छत्रपती संभाजीनगर ता. जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले आहेत अर्जदार क. १ ही मयताची पत्नी आहे अर्जदार क. २ व ३ हे मयताचे मुले आहेत तसच मयताची आई वडील हे देखील फार पुर्वीच मयत झालेले आहेत अर्जदार यांच्याशिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत, अर्जदाराचे असेही म्हणणे आहे की, शासकीय कामासाठी, कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यानी है प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुगवा घेऊन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी. पुढील दिनांक २९/०७/२०२५

आज दिनांक २५/०७/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

स्वाक्षरीत
क. लि.

आदेशावरुन,
स्वाक्षरीत
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, व स्तर, बीड

# पसायदानच्या अनाथ व गरजु मुलांना अन्नदान

बीड । प्रतिनिधी

पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त शेख फाउंडेशन व समाज कल्याण न्यास यांच्या संयुक्त विद्यमाने ढेकणमोह येथील पसायदान सेवा प्रकल्पातील अनाथ व गरजु मुलांना अन्नदान करण्यात आले. तसेच पसायदानच्या परिसरात वृक्ष लागवड करण्यासह मुलांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

शेख फाउंडेशन आणि समाज कल्याण न्यास यांच्या वतीने दरवर्षी पसायदान सेवा प्रकल्पामध्ये सामाजिक उपक्रम राबवला जातो. पसायदानच्या अनाथ व गरजु मुलांना गेल्या १५ वर्षापासून पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त शैक्षणिक साहित्याचे वाटप, अन्नदान करण्यात येत आहे. यंदाही दि. २६ जुलै रोजी ढेकणमोह येथील पसायदाच्या






मुलींच्या हस्ते केक कापून पंकजाताई मुंडेंचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. तसेच पसायदान प्रकल्पात मुलांना एक दिवसाचे अन्नदान करण्यात आले. यावेळी भाजपचे नेते शेख फारुख, बाबुराव खाडे, अॅड. विनोद जायभाये, पत्रकार अशोक खाडे, गोरख मुंडे, गणेश दराडे, डॉ.डिगे, शिवाजी चाटे, मतीन बागवान, संदीप अदमाने, रमेश कदम, इलियास पठाण, पप्पु तावरे, मुबारक शेख व सायदानचे संचालक गोवर्धन दराडे आदींच्या उपस्थितीत वृक्षारोपण आणि शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

**टि.सी.हरवला आहे**

आदिती प्रमोद मुळीक शारदा इंग्लिश स्कुल केज १० वी पास टि.सी.केज ते धारूर प्रवासादरम्यान हरवला आहे ,तरी कोणाला सापडला तर खालील नंबरला वर संपर्क साधा

**संपर्क**
**९४२१२७८०२७**

# ब्रम्हगाव साठे जयंती उत्सव समितीची कार्यकारणी जाहिर

## अध्यक्षपदी सुधाकर कांबळे तर उपाध्यक्षपदी अंशीराम कांबळे

माजलगाव । प्रतिनिधी

शहरापासुन जवळच असलेल्या ब्रम्हगाव येथे नुकतीच गावकर्यांच्या वतीने संयुक्त बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.या बैठकीत सर्वानुमते लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समितीची कार्यकारणी जाहिर करण्यात आली असुन,अध्यक्षपदी सुधाकर कांबळे यांची तर उपाध्यक्षपदी अंशीराम कांबळे यांची निवड करण्यात आली आहे.यावेळी काँग्रेस पक्षाचे नेते तथा आंबेडकरी चळवळीचे सामाजिक कार्यकर्ते दत्ता कांबळे यांनी गुलाब पुष्पहार घालून अध्यक्ष व उपाध्यक्ष सह सर्व सदस्य व कार्यकारणीचा सत्कार




करून जंगी कार्यक्रम करण्यासाठी प्रोत्साहन दिले.

यावेळी ब्रम्हगाव येथे अण्णाभाऊ साठे जयंती विवीध सामाजिक उपक्रमाने साजरी करण्यात येणार असुन यामध्ये व्याख्यान, महिलांना साडी वाटप,जिल्हा परिषद शाळेला कॉम्प्युटर व प्रोजेक्टरची भेट, संविधान प्रतींचे वाटप असे विवीध उपक्रम होणार आहेत.यासाठी गावाच्या स्वखर्चाने जयंती साजरी होणार असुन इतरांना वर्गणी न मागण्याचा संकल्प करण्यात आला आहे.जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी अध्यक्षपदी सुधाकर कांबळे यांची तर उपाध्यक्षपदी अंशीराम कांबळे, सचिव विठ्ठल कांबळे,अशोक कांबळे,श्रीमंत कांबळे,सहसचिव अंजन कांबळे, कोषाध्यक्ष दशरथ कांबळे,सदस्य बाबासाहेब कांबळे, भानुदास कांबळे यांच्या निवडी करण्यात आल्या, तर अशोक कांबळे, मधुकर कांबळे,बंडू कांबळे,शिवाजी कांबळे, निलेश कांबळे सह गावकर्यांनी या सार्थ निवडीचे स्वागत केले.

राज्य लोकतंत्र
शनिवार दि. २६ जुलै २०२५ | ६

























This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# साहेब, चॉकलेट देऊ नका, काम करा

## आमदारांच्या पीएचा सहआयुक्तांना धमकीवजा इशारा

पिंपरी । प्रतिनिधी

'साहेब, चॉकलेट देऊ नका, मला शुगर आहे. त्यापेक्षा आमची कामे करा.' असा इशारा चिंचवड विधानसभेच्या आमदारांच्या स्वीह सहायकाने सहआयुक्तांच्या त्यांच्याच दालनात दिला. यामुळे महापालिकेमध्ये अधिकार्यांवर राजकीय दबाव किती वाढला आहे हे समोर आले. गुरूवारी (दि. २४) महापालिकेच्या चौथ्या मजल्यावरील सह आयुक्तांच्या दालनामध्ये घडलेल्या या प्रकाराने सगळेच अवाक झाले.



आमदार शंकर जगताप यांचे स्वीय सहायक (पीए) बाला शुक्ला हे गुरुवारी (दि.२४) महापालिका भवनात आले होते. त्यांनी सहआयुक्त मनोज लोणकर यांची त्यांच्या दालनामध्ये भेट घेतली. यावेळी शुक्ला यांनी कर्मचाऱ्यांच्या बदल्या आाण इतर काहा प्रशासकाय कामांची यादी लोणकर यांच्यासमोर ठेवली. या सर्व कामांवर सहआयुक्त लोणकर यांनी सकारात्मक प्रतिसाद देत, ती मार्गी लावण्याचे आश्वासन दिले. कर संकलन मधील कर्मचार्याची बदली करू नका.

अभियंत्याला पदाचा कार्यभार द्या अशा अनेक सूचनांचा त्यांची भडीमार केला. त्यानंतर त्यांनी जाता-जाता सहआयुक्तांना उद्देशून एक सूचक विधान केले. साहेब, तुम्ही सगळ्याच कामांना हो म्हणत आहात, हे चांगलं आहे. पण नुसते चॉकलेट नका देऊ, मला शुगर आहे, असे ते म्हणाले. यातून साहेब आमचे काम करा, फक्त आश्वासने देऊ नका नाहीतर परिणाम वाईट होतील, असा गर्भित इशारा शुक्ला यांनी दिला.

आमदार कारवाई करणार का?

या घटनेमुळे महापालिका प्रशासनावर राजकीय व्यक्तींचा दबाव किती वाढला आहे, हे स्पष्ट झाले आहे. बदल्या, ठेके आणि अन्य आर्थिक हितसंबंधांच्या कामांसाठी प्रशासकीय अधिकाऱ्यांवर कशाप्रकारे दबाव टाकला जातो, हे या निमित्ताने पुन्हा एकदा समोर आले आहे. ही घटना महापालिकेतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमध्ये चर्चेचा विषय बनली असून, अनेकांनी याबद्दल नाराजी व्यक्त केली आहे. यावरून आमदार त्यांच्या स्वीह सहायकांवर कारवाई करणार का असा सवाल उपस्थित केला जात आहे.

# पोलीस आयुक्त थेट उतरले रस्त्यावर; हिंजवडी वाहतूक कोंडीची प्रत्यक्ष पाहणी करत दिल्या सूचना

पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी

राजीव गांधी आयटी पार्क, हिंजवडी परिसरातील वाढती वाहतूक कोंडी हा चर्चेचा विषय ठरला आहे. या ठिकाणी अनेक कंपन्या असून कर्मचाऱ्यांना येण्या-जाण्यासाठी त्रास सहन करावा लागत आहे. ही बाब लक्षात घेऊन पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी गुरुवारी रस्त्यांची पाहणी केली. या दौऱ्यात वाहतूक सुरळीत करण्यासाठी तातडीच्या उपाययोजना सुचवत काही ठिकाणी प्रायोगिक तत्त्वावर वाहतूक बदल करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.



पाहणीदरम्यान अनेक ठिकाणी चुकीच्या दिशेने सुरू असलेल्या वाहतुकीवर बंदी आणण्यासाठी सुरक्षा कठडे (बॅरिकेड्स) बसविण्यात आले. काही रस्त्यांवर एकेरी वाहतुकीचा प्रयोग, वाहतूक वळवणे, अतिक्रमण हटवणे आणि वाहतूक सुलभ करण्यासाठी रोहित्र (डीपी) हटवण्याच्या सूचना करण्यात आल्या. या उपाययोजनांमुळे तरी हिंजवडी भागातील वाहतूक कोंडी सुटेल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या पाहणी दौऱ्यात सह पोलीस आयुक्त शशिकांत महावरकर, अपर आयुक्त सारंग आवाड, पीएमआरडीएचे अपर आयुक्त दीपक सिंगला, वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त विवेक पाटील, परिमंडळ तीनचे उपायुक्त विशाल गायकवाड, वाकडचे सहायक पोलीस आयुक्त सुनील कुराडे, हिंजवडीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बालाजी पांढरे तसेच मोहिमेचे समन्वयक सचिन गुणाले आणि सचिन लोंढे सहभागी होते. याशिवाय महावितरण, पीएमपीएमएल व एमआयडीसीचे अधिकारीही उपस्थित होते. महत्वाच्या ठिकाणी केलेल्या पाहणीत काही सूचना देण्यात आल्या आहेत. यामध्ये वाहतूकमध्ये आणि रस्त्यांमध्ये थोडेफार बदल सुचवण्यात आले आहेत.

# विद्यार्थ्यांसाठी पुणे मेट्रोचा मोठा निर्णय, पदवीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या सर्वांसाठी 'वन पुणे विद्यार्थी पास' पूर्णपणे मोफत

पुणे । प्रतिनिधी

पुणेकरांसाठी एक अतिशय आनंददायी बातमी समोर आली आहे. पुण्यातील विद्यार्थ्यांसाठी पुणे मेट्रोने एक मोठा निर्णय घेतला आहे. यात पदवीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना आता 'वन पुणे विद्यार्थी पास कार्ड' हा पूर्णपणे मोफत देण्यात येणार आहे. पुणे मेट्रो प्रकल्पाचा पहिला टप्पा पूर्ण झाला असून यामधील २९ स्थानके प्रवासी सेवेत दाखल झाली आहेत. पुणे मेट्रो, पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरातील एक प्रमुख सार्वजनिक व्यवस्था बनण्याकडे वाटचाल करीत आहे. अशातच या सेवेचा आता विद्यार्थ्यांना मोठा लाभ मिळणार असून त्यांचा प्रवासाचा खर्चहि वाचणार आहे. दरम्यान, या निर्णयाचे



आता विद्यार्थ्यांसह पालकांनी स्वागत केलं आहे.

सध्या पुणे मेट्रोची दैनंदिन प्रवासी संख्या हि १ लाख ९० हजार पेक्ष्या जास्त आहे. या प्रवासी संख्येमध्ये एक मोठा वाटा विद्यार्थी समूहाचा आहे. शहरातील अनेक शैक्षणिक संस्थांमध्ये लवकरच नवीन शैक्षणिक वर्षाला सुरुवात होत आहे. त्यामुळे मेट्रोतून प्रवास करणाऱ्या पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरातील विद्यार्थ्यांसाठी पुणे मेट्रो एक खास भेट घेऊन आली आहे. यात २५ जुलै २०२५ ते १५ सप्टेंबर २०२५ या कालावधीत, पदवीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी 'वन पुणे विद्यार्थी पास कार्ड' (घधउ)' पूर्णपणे मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यात ११८ रुपयांना (रु 100 + é 18 - GST) मिळणारे विद्यार्थी पास कार्ड आता या कालावधीत पूर्णपणे मोफत मिळणार आहे. पण हे कार्ड घेताना सोबत किमान २०० रुपयांचा टॉप-अप करणे अनिवार्य असणार आहे. या २०० रुपयांचा कार्ड घेणाऱ्या विद्यार्थ्यांना पूर्णपणे २०० रुपये टॉप-अप मिळणार असून त्यामध्ये कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही.

**दररोज सर्व प्रवासावर ३० % सवलत**


या विशेष उपक्रमात 'विद्यार्थी पास कार्ड' घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना पुणे मेट्रोमध्ये प्रवासादरम्यान दररोज सर्व प्रवासावर ३० % सवलत उपलब्ध असणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांचा प्रवास अधिक सुखकर होईल, सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढेल आणि पुणे शहरातील विद्यार्थ्यांसाठी एक समाविष्ट आणि सहाय्यक वातावरण निर्माण होईल.

# लम्पी आजाराबाबत पुणे प्रशासन 'ॲक्शन मोड'वर; प्रादुर्भाव रोखण्यासाठी दिल्या 'या' महत्त्वपूर्ण सूचना

**पुणे । प्रतिनिधी**

**जिल्ह्यातील लम्पी चर्म रोगाचा प्रादुर्भाव लक्षात घेता लसीकरण मोहीम तसेच लम्पी रोग प्रतिबंधात्मक उपाययोजना प्रभावीपणे राबवण्यात याव्यात, असे निर्देश जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी दिले. जिल्ह्यामध्ये गोवंशीय जनावरांमध्ये लम्पी चर्मरोग या विषाणूजन्य आजाराचा प्रादुर्भाव दिसून आल्याने या रोगाचे नियंत्रण होण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली पशुसंवर्धन विभागाची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी डूडी बोलत होते.**

जिल्ह्यातील सर्वच तालुक्यामध्ये लम्पी चर्मरोगाने जनावरे आजारी असल्याने सध्या ९०६ जनावरांना या रोगाची बाधा झालेली आहे. यापैकी औषधोपचाराने ५९१ जनावरे बरी झाली असून, १५ जनावरे मयत झाली आहेत. सद्यस्थितीत जिल्ह्यामध्ये ३०० जनावरांवर उपचार सुरू असून, दिवसेंदिवस रोगाचा प्रसार होऊन यामध्ये वाढ होताना दिसत आहे. जिल्ह्यातील शिरुर, आंबेगाव, जुन्नरमध्ये सर्वाधिक जनावरांना लम्पी चर्मरोग विषाणूची बाधा झाल्याचे निदर्शनास आले आहे. त्या ठिकाणी संसर्ग केंद्राच्या पाच किलोमीटर परिसरामध्ये लसीकरण करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी डूडी यांनी अधिकाऱ्यांना



दिल्या.

रोग नियंत्रणाच्या दृष्टीने मनुष्यबळ कमी आहे, अशा ठिकाणी जिल्ह्यातून किंवा तालुक्यातून इतर अधिकाऱ्यांची नियुक्त करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. लम्पी चर्म रोगाने आजारी जनावरांसाठी त्वरित औषधोपचार करण्यात येऊन रोगाचा इतरत्र फैलाव होऊ नये यासाठी गोठा स्वच्छता, जैवसुरक्षा व विविध निर्जंतुक औषधांची फवारणी करण्याचेही निर्देशही डूडी यांनी दिले. ध्या जिल्ह्यात लम्पी चर्म रोगाचा सौम्य प्रादुर्भाव दिसून आला असून, उपचारानंतर बहुतांश जनावरे बरी होत आहेत.

सर्व शासकीय संस्थांमध्ये लम्पी चर्मरोगावर उपचार करण्यासाठी आवश्यक औषध पुरवठा उपलब्ध आहे. मुख्यमंत्री पशुस्वास्थ्य योजनेतील ५, केंद्र पुरस्कृत योजनेतील १ फिरत्या पशुचिकित्सा पथकाद्वारे पशुपालकांच्या दारात उपचार करण्यात येत आहे. पशुपालकांनी लम्पी चर्मरोग बाधित पशुधनास उपचार करण्यासाठी १९६२ या विभागाच्या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. योग्य त्या जैवसुरक्षा उपाययोजनांची अंबलबजावणी, बाधित जनावरांचे तात्काळ व योग्य औषधोपचार केले आणि अबाधित क्षेत्रात १०० टक्के लसीकरण केले तर या रोगाचे प्रभावीपणे नियंत्रण करता येते. असे गेल्या दोन वर्षात निदर्शनास आले असून, त्यादृष्टीने सर्वांनी उपाययोजना कराव्यात, असेही त्यांनी सांगितले.

# ज्येष्ठ नागरिकांनी उपचारासाठी सरकारच्या योजनांचा लाभ घ्यावा

पिंपरी । प्रतिनिधी

चिंचवडगावात ज्येष्ठ नागरिकांचा वाढदिवस समारंभ उत्साहात संपन्न झाला. चिंचवड जेष्ठ नागरिक संघाच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी तब्बल २५ ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या वाढदिवसानिमित्त गौरविण्यात आले.



कार्यक्रमास चिंचवड विधानसभेचे शहर संघटक संतोष रमाकांत सौंदणकर, राष्ट्रीय जीवन गौरव पुरस्कार विजेते विश्वास सोहनी यांची प्रमुख उपस्थित होती. यावेळी चिंचवड जेष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष रमेश इनामदार तसेच मोठ्या संख्येने जेष्ठ नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नंदकुमार मुरडे, प्रास्ताविक संघाचे अध्यक्ष रमेश इनामदार सर यांनी केले. यावेळी त्यांनी संघाच्या कार्याची माहिती दिली. संगमरकर यांनी केलेल्या विविध कार्यक्रमांचा उल्लेख केला. यावेळी सौंदणकर म्हणाले, 'बहुतांशी जेष्ठ नागरिक आयुष्यभर काबाडकष्ट करून आता स्थिरावले आहेत. या दरम्यानच्या काळात विविध आजारांना सामोरे जावे लागू शकते. त्यासाठी खासगी रुग्णालयांचा आधार घ्यावा लागतो.

आयुष्यभर जमविलेली पुंजी खर्च होऊ शकते. तसे करू नका. कारण आज सरकारने ज्येष्ठ नागरिकांच्या उपचारासाठी विविध योजना आणल्या आहेत. त्याचा लाभ घ्या. विनाकारण पैसे खर्च करू नका. त्यासाठी योग्य ती मदत करण्यास आम्ही तत्पर आहोत. दरम्यान आता रखडलेल्या निवडणुका लवकरच होणार आहेत. त्यासाठी मतदारांनी शंभर टक्के मतदान केले पाहिजे. घरी बसू नका. मतदान हे राष्ट्रीय कर्तव्य आहे. सोहनी म्हणाले, जीवनात हसत राहिले पाहिजे. हसण्यामुळे आपण अनेक आजारांवर मात करू शकतो. हास्यक्लबच्या माध्यमातून हसण्याचे विविध प्रकार शिकविण्यात येत आहेत. त्याचा सर्वांनी फायदा घ्यावा.

# पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावर १०.५ कोटींच्या 'हायड्रोपोनिक वीड'सह प्रवासी अटक

पुणे । प्रतिनिधी

पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावर एअर पुणे कस्टम्सच्या अधिकाऱ्यांनी मोठी कारवाई करत बँकॉकहून आलेल्या एका भारतीय प्रवाशाला १०.५ कोटी रुपये किमतीच्या 'हायड्रोपोनिक वीड' (मारिजुआना) सह




अटक केली आहे. संशयास्पद हालचालींमुळे या प्रवाशाला ताब्यात घेण्यात आले होते, त्याच्याकडून सुमारे १०.४७ किलो अंमली पदार्थ जप्त करण्यात आला आहे.

एअर पुणे कस्टम्सच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, अभिनय अमरनाथ यादव असे अटक करण्यात आलेल्या प्रवाशाचे नाव आहे. तो इंडिगो फ्लाइट क्रमांक ६ए-१०९६ ने २४ जुलै २०२५ रोजी बँकॉकहून पुण्यात दाखल झाला होता. तपासणीदरम्यान त्याच्याकडे आढळलेल्या हायड्रोपोनिक वीडची आंतरराष्ट्रीय बाजारात किंमत अंदाजे १०.५ कोटी रुपये आहे.

या प्रकरणी एनडीपीएस (नार्कोटिक ड्रग्स अँड सायकोट्रॉपिक सब्स्टन्सेस) कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीला न्यायालयासमोर हजर केले असता, त्याला न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. कस्टम्स विभागाकडून या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

# एकदाही कर न भरलेले शहरात तब्बल ३४ हजार २२ मालमत्ताधारक; महापालिकेकडून आता केली जाणार 'ही' कारवाई

**पिंपरी । प्रतिनिधी**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर संकलन मोहिमेला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत असताना देखील काही मालमत्ताधारकांनी एकदाही कर भरलेला नाही. शहरात ३४ हजार २२ अशा मालमत्ताधारकांची नोंद असून, महापालिकेने त्यांच्या विरोधात कठोर कारवाई करण्याचे संकेत दिले आहेत. कर भरणा न केल्यास जप्तीची कारवाई अटळ असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.**



महापालिकेच्या कर आकारणी व संकलन विभागाने दिलेल्या माहितीनुसार, शहरात सुमारे ७ लाख ३१ हजार मिळकती नोंदविल्या असून, त्यापैकी ४ लाख २६ हजार मालमत्तांधारकांनी चालू आर्थिक वर्षात मालमत्ता कर भरला आहे. कर संकलन विभागाने पहिल्या तिमाहीत विक्रमी ५२२ कोटी रुपयांचा कर संकलन केला असून, संपूर्ण वर्षासाठी १३०० कोटींचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. हे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी १८ विभागीय कार्यालयांमार्फत काम सुरू आहे. कर संकलन विभागाच्या माहितीनुसार, १ लाख १२ हजार ८०९ निवासी मालमत्तांधारकांकडे सुमारे ३१० कोटी रुपये थकबाकी आहे. यामध्ये अनेक मालमत्तांधारक ५ ते १० वर्षांपेक्षा अधिक काळापासून कर भरत नाहीत. त्यामुळे अशा थकबाकीदारांवर महापालिकेने जंगम मालमत्ता जप्त करण्याची कारवाई हाती घेतली आहे. त्यामध्ये कार, टीव्ही, फ्रिज यांसारख्या घरगुती वस्तूंचाही समावेश असेल.महापालिकेने जाहीर केले आहे की, १ जुलै ते ३० सप्टेंबर २०२५ या कालावधीत मालमत्ता कर ऑनलाइन पद्धतीने भरल्यास ४ टक्के सवलत मिळणार आहे. नागरिकांनी आपला मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी मालमत्ता बिलाशी लिंक करून घ्यावा, जेणेकरून सर्व नोटिफिकेशन आणि सेवा डिजिटल स्वरूपात सहज मिळू शकतील.

# मजूराचा हरवलेला मोबाईल, पोलिसांच्या प्रामाणिक प्रयत्नाने परत मिळाला

शिरूर । प्रतिनिधी

शिरूर शहरातील बी.जे. कॉर्नर परिसरात वाहतूक नियमन करत असताना ट्रॅफिक पोलिसांनी दाखवलेली सजगता व प्रामाणिकपणा याचे कौतुक होत आहे. शिरूर पोलीस स्टेशनचे ट्रॅफिक पोलीस राजेंद्र वाघमोडे यांनी रस्त्यावर सापडलेला मोबाईल फोन योग्य तपासणी करून तो प्रत्यक्ष मालकाच्या हाती परत करताना मानवतेचे उत्तम उदाहरण घालून दिले.



सदर मोबाईल एका गवंडी काम करणाऱ्या गरीब मजुराचा होता. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत कष्ट करून पोट भरणाऱ्या या मजुरासाठी तो मोबाईल म्हणजे संपर्काचे एकमेव साधन होते. मोबाईल हरवल्यानंतर त्याच्यावर संकटाचे सावट होते. मात्र, ट्रॅफिक पोलीस वाघमोडे यांनी रस्त्यावर सापडलेला मोबाईल आपल्या ताब्यात घेत त्याची तातडीने चौकशी करून संबंधित मालकाचा शोध घेतला आणि मोबाईल त्याच्या ताब्यात दिला. मोबाईल मिळाल्यावर मजुराच्या डोळ्यात अश्रू तरळले. मी खुप गरीब माणूस आहे. हा मोबाईल म्हणजे माझ्या मुलांशी, नातेवाईकांशी संपर्क ठेवण्याचेच साधन होते. तो परत मिळवणे माझ्यासाठी स्वप्नवत होते, असे सांगताना त्याने पोलिसांचे आभार मानले.

या घटनेमुळे शिरूर पोलीस दलातील ट्रॅफिक विभागाची प्रतिमा आणखी उजळली आहे. ट्रॅफिक पोलीस राजेंद्र वाघमोडे यांच्या प्रामाणिक आणि सहृदय वृत्तीमुळे नागरिकांमध्ये पोलीस यंत्रणेबद्दलचा विश्वास अधिक बळकट झाला आहे. यावेळी सोबत पोलीस अमलदार आप्पासाहेब कदम, सचिन गोरे हे उपस्थित होते. या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत असून, अशा प्रामाणिक अधिकाऱ्यांमुळेच पोलीस फक्त कायदा रक्षक नव्हे, तर समाजाचे हितचिंतक सुद्धा आहेत हे पुन्हा सिद्ध झाले आहे.

# महापालिका नोकर भरतीत भूमिपुत्रांना न्याय द्यावा

पिंपरी । प्रतिनिधी

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने माहे ऑगस्ट २०२३ मध्ये सुधारित आकृतीबंध राज्य शासनाकडे पाठविला असून त्यास अद्यापदेखील मंजुरी मिळालेली नाही. त्यामुळे महापालिकेतील सर्व विभागातील एकूण ४ हजार ७८४ जागा रिक्त आहेत. मागील काही वर्षांमध्ये बीट निरीक्षक व फायरमन व इतर अशा ५३६ जागांची भरती महापालिकेच्या वतीने करण्यात आली होती.

परंतु, या प्रक्रियेमध्ये स्थानिक भूमिपुत्रांना संधी मिळाल्याचे दिसून येत नाही त्यामुळे महापालिकेच्या वतीने सादर केलेल्या सुधारित आकृतीबंधास मंजुरी देत महापालिका नोकर भरतीमध्ये स्थानिक भूमिपुत्रांना न्याय देण्याची मागणी भाजपचे माजी नगरसेवक संदीप वाघेरे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेकडे ई मेल द्वारे केली आहे.



याविषयी अधिक माहिती देताना वाघेरे म्हणाले कि, वास्तविक पाहता पिंपरी चिंचवड शहराच्या विकासामध्ये येथील स्थानिक भूमिपुत्रांनी मोठ्या प्रमाणावर त्याग केलेला आहे, १९६०-७० च्या दशकात औद्योगिक क्षेत्र उभारण्यासाठी एमआयडीसी, लष्कराचे प्रकल्प, मिलेट्री डेअरी फार्म, एच. ए. कंपनी अश्या अनेक प्रकल्पांसाठी शेकडो स्थानिक शेतकऱ्यांनी आपली उपजाऊ शेतीची जमीन सरकारला दिली असून पुणे - मुंबई महामार्ग, पिंपरी इंडस्ट्रियल बेल्ट वाढीसाठी देखील अनेक गावे विस्थापित झाली. पिंपरी, चिंचवड, आकुर्डी, निगडी, भोसरी, तळवडे यासारखी अनेक गावे आता शहराचा भाग बनली, पण मूळ रहिवाशांची ओळख धूसर झाली आहे. त्यामुळे स्थानिक भूमिपुत्रांना नोकऱ्या, उद्योग आणि शिक्षणाच्या कमी संधी मिळाल्या आहेत. रोजगारासाठी अनेकांना हलकी, अस्थायी कामे स्वीकारावी लागत आहेत.

महापालिकेकडे सद्यस्थितीला एकूण ६ हजार ७८४ पदांवर अधिकारी व कर्मचारी कार्यरत असून ४ हजार ७७६ जागा रिक्त आहेत. या रिक्त जागांवर किमान ५० टक्के जागा स्थानिक भूमिपुत्रांसाठी आरक्षित ठेवल्यास स्थानिक भूमिपुत्रांनी शहराच्या विकासासाठी केलेल्या त्यागासाठी त्यांना न्याय मिळणार आहे.आज पिंपरी-चिंचवड हा देशातील एक प्रमुख औद्योगिक शहर म्हणून ओळखला जातो परंतु, यामागे स्थानिकांच्या पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या त्यागाचे पाठबळ आहे. आजही त्यांचा सहभाग आणि सन्मान जपणे ही सामाजिक आणि प्रशासकीय जबाबदारी आहे. आपण महापालिकेच्या वतीने राज्य शासनाकडे पाठविण्यात आलेल्या सुधारित आकृतीबंधास मंजुरी देत स्थानिक भूमिपुत्रांना न्याय मिळवून द्यावा अशी आग्रही मागणी वाघेरे यांनी निवेदनामध्ये केली आहे.